cmyk




गणपती बाप्पा मोरया

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com  नवी दिशा... नवे विचार.....  email:rajyaloktantra75@gmail.com

ज्येष्ठा गौरी पुजन
निमित्त सर्वांना
हार्दिक शुभेच्छा..!



बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१२७ | सोमवार, दि.१ सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


# गावागावातील शेत रस्त्यांचे प्रश्न मिटणार!

## जमिनीचे वाद मिटवण्यासाठी सरकारचा पुढाकार ; शिवार फेरी काढून करणार जनजागृती

**पुणे । प्रतिनिधी**

**शेताकडे जाणाऱ्या रस्त्यांना विशिष्ट क्रमांक देऊन ओळख निर्माण करण्याचा महसूल विभागाने निर्णय घेतला आहे. या क्रमांकामुळे रस्त्यांची नोंदणी सोपी होईल आणि सर्व शेतकऱ्यांच्या सोयीसाठी शेतापर्यंत पोहोचणे सुलभ होईल. तसेच अरुंद शेत रस्ते रुंद करण्याची योजना आणली आहे. गावनिहाय रस्त्यांची यादी तयार करण्यासाठी ग्रामस्थांच्या मदतीने शिवार फेरी काढण्याचे निर्देशही महसूल** विभागाने दिले आहेत.



महसूल विभागाने या रस्त्यांना ओळख निर्माण करण्यासाठी आदेश काढले आहेत. महत्त्वपूर्ण पाऊल उचलताना महसूल शेतकरी व कृषी विकासाच्या दृष्टीने सुसूत्र विभागाने शेतरस्त्यांच्या व्यवस्थापनासाठी या आदेशाची तातडीने अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले ▶▶ पान २ वर

### शेतकऱ्यांना असे होणार फायदे

१) प्रत्येक शेतरस्त्याची ओळख निर्माण झाल्यामुळे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण सोपे होणार, २) रस्त्यांचे सीमांकन झाल्यामुळे जमिनीशी संबंधित वाद कमी होतील ३) आधुनिक यंत्रसामग्री शेतापर्यंत नेणे अधिक सुलभ होईल ४) डिजिटल नकाशांवर सुस्पष्टता येईल ५) अडचणीचे ठरणारे अतिक्रमण काढले जाईल.

# आरक्षण घेतल्याशिवाय मुंबई सोडणार नाही

## आजपासून पाणीही बंद जरांगेंचा सरकारला इशारा

**मुंबई । प्रतिनिधी**

**मराठा समाजाला आरक्षण दिले नसल्याने प्रचंड मोठी वेदना आहे. मुंबईत मराठा बांधवांची केवळ गर्दी झाली आहे, असे सरकारने समजू नये, तर वेदना समजावी. सोमवारपासून पाणीही बंद करणार आहे. आरक्षण घेतल्याशिवाय मुंबई सोडणार नाही, असा इशारा मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी रविवारी राज्य सरकारला दिला. ते आझाद मैदानावर पत्रकार परिषदेत बोलत होते.**



मराठा मोर्चा आणि आरक्षणाबाबत सर्व गोष्टींची उत्तरे एकनाथ शिंदेच देऊ शकतील. मनोज जरांगे परत का आले याचेही उत्तर एकनाथ शिंदेंना विचारा, अशा शब्दात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधला होता. यावर बोलताना जरांगे म्हणाले की, दोघे ठाकरे भाऊ आणि ठाकरे ब्रँड चांगला आहे. पण राज ठाकरे विनाकारण मराठ्यांच्या प्रश्नात पडतात. त्यांना ११ ते १३ आमदार निवडून दिले पण ते पळून गेले. लोकसभेला फडणवीसांनी त्यांचा गेम केला. विधानसभेला मुलाचा पराभव केला. राज ठाकरे म्हणजे मानाला भुकालेले पोरगं आहे. ▶▶ पान २ वर

# खा.सुळेंना आंदोलकांचा घेराव

## कारवर भिरकावल्या पाण्याच्या बाटल्या



**मुंबई ।प्रतिनिधी**

**ऐन गणेशोत्सवात मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून राज्याचे राजकारण ढवळून निघाले आहे. मनोज जरांगे यांचे मुंबईतील आझाद मैदानावर उपोषण सुरु आहे. रविवारी (दि.३१) दुपारी खासदार सुप्रिया सुळे यांनी जरांगे यांची भेट घेतली. या भेटीनंतर त्या जात असताना मराठा आरक्षण आंदोलकांनी घेराव घातला. यावेळी काहींनी सुळे यांच्या कारवर पाण्याच्या बाटल्या फेकत शरद पवारांविरोधात जोरदार घोषणाबाजीही केली. त्यामुळे येथील वातावरणात तणाव निर्माण झाला होता.**

खासदार सुप्रिया सुळे यांनी मनोज जरांगे–पाटील यांची भेट घेतली. त्यांनी चर्चा करुन ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### न्यायालयांमध्ये महिला न्यायाधीशांची संख्या कमी

नवी दिल्ली: सर्वोच्च न्यायालय आणि देशभरातील उच्च न्यायालयांमध्ये महिला न्यायाधीशांचे प्रमाणापेक्षा कमी प्रतिनिधित्व असल्याने सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनने शनिवारी चिंता व्यक्त केली. बार असोसिएशनने याविषयीचा एक ठराव मंजूर केला. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांमध्ये आगामी काळातील न्यायिक नियुक्त्यांमध्ये अधिक महिला न्यायाधीशांच्या पदोन्नतीवर तातडीने आणि योग्य विचार करण्याची विनंती भारताचे सरन्यायाधीश आणि कॉलेजियमने करावा अशी मागणी ठरावात करण्यात आली. बार असोसिएशनने म्हटले की, उत्तराखंड, त्रिपुरा, मेघालय आणि मणिपूर सारख्या अनेक उच्च न्यायालयांमध्ये सध्या एकही महिला न्यायाधीश नाही. देशभरात उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची सुमारे १ हजार १०० मंजूर पदे आहेत, त्यापैकी जवळजवळ ६७० पुरुष आहेत आणि फक्त १०३ महिला आहेत तर उर्वरित रिक्त आहेत.

### पंजाबात महापूर, अनेक गावे पाण्याखाली

चंदीगढ: पंजाबमध्ये आलेल्या पुरामुळे मोठे नुकसान झाले आहे. १० जिल्ह्यांमधील १०१८ गावांना पुराचा तडाखा बसला आहे. तर ६१००० हेक्टरहून अधिक शेती जमीन बाधित झाली आहे. सध्या येथे मदत आणि बचाव कार्य युद्धपातळीवर सुरू आहे. गुरुदासपूर जिल्ह्यातील सर्वाधिक गावांना पुराचा फटका बसला आहे. राज्याचे जलसंपदा मंत्री बी. कुमार गोयल यांनी जर केंद्राच्या अखत्यारीतील भाक्रा बियास व्यवस्थापन मंडळाने (बीबीएमबी) जूनमध्ये वेळेवर पाणी सोडले असते तर हा विध्वंस मोठ्या प्रमाणात कमी करता आला असता, असा दावा केला आहे. पंजाब सरकारने चार दिवसांसाठी शाळांना सुट्टी जाहीर केली होती.

### मोहम्मद पैगंबर जुलूस गणेश विसर्जनानंतरच

मुंबई : मुस्लिम समाजासाठी पवित्र असलेला मोहम्मद पैगंबर यांचा जन्मदिन यावर्षी शुक्रवारी दिनांक ५ सप्टेंबर रोजी आहे. त्यानंतर शनिवारी, दिनांक ६ रोजी राज्यभरात अनंत चतुर्दशी निमित्त गणेश विसर्जन पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर परंपरेप्रमाणे निघणारा ईद–ए–मिलादुन नबीचा जुलूस यंदा सोमवार, दिनांक ८ सप्टेंबर रोजी काढण्यात येणार आहे. त्यामुळे या दिवशी शासकीय सुट्टी जाहीर करावी, अशी मागणी समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात बोलताना आमदार रईस शेख म्हणाले की, ''राज्यात हिंदू–मुस्लिम ऐक्य व सामाजिक बंधुभाव कायम राहावा, हा आमचा प्रयत्न आहे. यासाठीच २१ ऑगस्ट रोजी ऑल इंडिया खिलाफत कमिटी, मुंबई येथे विविध मुस्लिम संघटनांची बैठक झाली. या बैठकीत सर्वानुमते निर्णय घेऊन जुलूस ८ सप्टेंबर रोजी काढण्याचे निश्चित झाले.

### नोकरी आमिषाने कारमध्येच ६ जणांकडून अत्याचार

मयूरभंज: ओडिशातील मयूरभंज जिल्ह्यात एका तरुणीवर सहा जणांनी सामूहिक बलात्कार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. नोकरीचे आमिष दाखवून आरोपींनी तिला उदला–बालासोर राज्य राजमार्गावर नेले आणि तिथे वाहनात तिच्यावर आळीपाळीने बलात्कार केला. या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, या घटनेमुळे महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन आरोपी पीडित तरुणीच्या घरी आले होते. त्यांनी तिला नोकरीचे आमिष दाखवले आणि त्यासाठी त्यांच्यासोबत येण्यास सांगितले. तरुणीला नोकरीची गरज असल्याने ती त्यांच्यासोबत जाण्यास तयार झाली. तिथे आणखी चार जण त्यांना भेटले. त्यानंतर हे सहाही जण एका गाडीत बसून सुमारे ८० किलोमीटर अंतरावरील उदला–बालासोर राज्य राजमार्गावर पोहोचले.

### अभिनेत्री प्रिया मराठेचे निधन

मुंबई : छोट्या पडद्यावरील मालिका आणि वेब सिरीजमधून घराघरात पोहोचलेली अभिनेत्री प्रिया मराठे हिचे निधन झाले आहे. मुंबईतील मीरारोड परिसरातील निवासस्थानी तिचे निधन झाले. ती अवघ्या ३८ वर्षांची होती. प्रिया मराठे हिला काही वर्षांपूर्वी कर्करोगाचे निदान झाले. मध्यंतरी ती या दुर्धर आजारातून बरीही झाली होती. मात्र, अलीकडेच तिच्या शरीरात कर्करोग पुन्हा पसरु लागला. अखेर रविवारी सकाळी तिची प्राणज्योत मालवली.प्रिया मराठे ही मध्यंतरी कर्करोगातून बरीही झाली होती. तिने यानंतर परदेशात एका नाटकाचा दौरा केला होता. मात्र, गेल्या काही महिन्यांमध्ये कर्करोगाने पुन्हा डोकेवर काढले होते. गेल्या काही दिवसांपासून तिच्यावर उपचार सुरु होते. मात्र, तिचे शरीर या उपचारांना प्रतिसाद देत नव्हते.

# लक्ष्मण हाके आणि मराठा आंदोलक आमनेसामने

**पुणे । प्रतिनिधी**


ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मोठा दावा केला आहे. नीराकडून लोणंदच्या दिशेला जात असताना माझ्यावर हल्ला झाला, असा मोठा दावा लक्ष्मण हाके यांनी केला आहे. नीरा गावाजवळ हा हल्ला झाल्याचा आरोप हाके यांनी केला आहे. आपण चहा पिण्यासाठी थांबलेलो असताना आपल्यावर हल्ला झाला, असा दावा लक्ष्मण हाके यांनी केला आहे. खरंतर लक्ष्मण हाके आणि मराठा आंदोलकांचा एकमेकांना ▶▶ पान २ वर

# बीडमध्ये बनावट नोटांचे रॅकेट सक्रिय

**बीड । प्रतिनिधी**

**पाचशे रूपयांच्या बनावट नोटा खऱ्या असल्याचे भासवून कॅशडिपॉझीट मशिनमध्ये टाकण्याचा प्रयत्न बीडमधील सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून समोर आला आहे. या प्रकरणी कॅशिअरच्या तक्रारीवरून तरूणा विरूध्द शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.यावरून बनावट नीताचे रॅकेट पुन्हा सक्रिय झाल्याची भीती निर्माण झाली आहे.**

बीड शहरातील बाश रोडवरील बाजीराव जगताप कॉम्प्लेक्स मधील एका बँकेचे कॅशिअर नकुल घुंगरड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीत म्हटले आहे की, आगम वैभव सोपानराव (रा.पिंपरगव्हाण ता.बीड) याने ▶▶ पान २ वर



# शरद पवारांच्या घराबाहेर सुरक्षा वाढवली

**मुंबई । प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे आज मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी आझाद मैदान येथे गेल्या. सुप्रिया सुळे यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिल्यानंतर त्या परतीच्या दिशेला निघाल्या होत्या. पण यावेळी आंदोलकांनी त्यांना घेराव घातला. आंदोलकांनी विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. आक्रमक आंदोलकांनी सुप्रिया सुळे यांच्या गाडीवर बाटल्या फेकल्य. या घटनेनंतर आता सुरक्षा यंत्रणा सतर्क झाली आहे.**



सुप्रिया सुळे यांच्यासोबत घडलेल्या घटनेनंतर मुंबई पोलीस आक्रमक झाले आहेत. विशेष ▶▶ पान २ वर

# ओबीसीतून आरक्षणाला अनेक अडचणी–मुख्यमंत्री

**मुंबई । प्रतिनिधी**

जरांगे पाटील यांनी ओबीसी कोट्यातून आरक्षणाची मागणी केल्याने सरकारची कोंडी झाली असून सरकार दरबारी ही कोंडी फोडण्यासाठी हालचाली सुरू आहेत. अशातच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका मराठी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत मराठा आंदोलनाबद्दल आणि आरक्षणाबाबत सविस्तर भाष्य करत आपली भूमिका मांडली आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ''मनोज जरांगे पाटील आता ज्या मागण्या करत आहेत त्याकडेही आम्ही सकारात्मकतेने बघत आहोत. त्यामध्ये कुठलीही नकारात्मकता नाही. कोणतीही मागणी मान्य करायची तर ती कायद्याच्या चौकटीत बसली पाहिजे. मराठ्यांचा ओबीसीमध्ये समावेश करा, अशी मागणी होत ▶▶ पान २ वर

# परळी रेल्वे स्थानकात पाच वर्षाच्या बालिकेवर अत्याचार

**परळी वै. । प्रतिनिधी**

**परळी वैजनाथ येथे माणुसकीला काळीमा फासणारी घटना आज दि. ३१ रोजी सकाळच्या सुमारास घडली रेल्वे स्थानकात थांबलेल्या एका पाच वर्षीय बालिकेला उचलून नेत तिच्यावर बलात्कार केल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. दरम्यान घटनेची माहित पंढरपूर येथील एक जोडपे आपल्या लहानग्या पाच वर्षीय मुलीला घेऊन कामाच्या शोधात परळीला रेल्वेने आले होते.**

ते रेल्वेस्थानकावर आले. या ठिकाणी हे पती–पत्नी आपल्या मुलीसह उतरले. यातील पीडित बालिकेची आई दोन–तीन दिवसापासून आजारी आहे. त्यामुळे रेल्वे स्थानकावरच थोडा वेळ आराम करून आपण बाहेर जाऊ असा विचार करून ती आपल्या मुलीला कुशीत घेऊन त्याच ठिकाणी झोपली. पिडित मुलीचे वडील स्थानकातच थोडेसे बाजूला गेलेले होते.दरम्यान तेवढ्या काही वेळात या मुलीच्या ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.२१ ऑगस्ट २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५.५० क्विंटल | २,५६१ | २,७१६ | २,६५९ |
| ज्वारी/हायब्रिड :६२.०० क्विंटल | २,१५० | २,६४५ | २,४३१ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : ४.०० क्विंटल | ६,००० | ६,१०० | ६,०५० |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,४५० | ४,४५० | ४,४५० |
| बाजरी: २८.०० क्विंटल | १,८०० | २,८५२ | २,५११ |
| मुग: १.०० क्विंटल | ८,१९१ | ८,१९१ | ८,१९१ |
| सोयाबीन: ०.५० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०१ | ५,८०० |

# धन्य तुम्ही ! कार्यकर्त्यांनी मुंबईलाच बीड केले

राज्य लोकतंत्र
**भाग चौथा। सुभाष चौरे**

पुणे– बीड: हे गणराया, बीडची प्रतिमा महाराष्ट्रात फार काही चांगली आहे असे नाही ती कोणामुळे झाली हे तुम्हालाही माहित आहे. पण ही प्रतिमा मलीन करण्यात नेत्यांबरोबर कार्यकर्तेही तेवढेच जबाबदार आहेत. आता समाजाच्या मागण्यासाठी एक लढावय्या उपोषण करतोय, दुसरीकडे कार्यकर्ते मात्र वेगवेगळे स्टंट करताना दिसत आहेत. हे सोशल मीडियाच्या माध्यमातून महाराष्ट्र नाही जग पाहत आहे जे बीडमध्ये एकमेकावर चिखल फेक होत होती जे स्टंट बीडमध्ये केले जात होते अगदी तशीच पद्धत सध्या मुंबईत



पहावयास मिळत आहे. आंदोलनामध्ये सर्वाधिक संख्या बीड जिल्ह्यातीलच आहे म्हणूनच म्हणतो काहींनी मुंबईलाच बीड केले आहे.

मुंबई कधी झोपत नाही आणि बीडकर झोपून देण्याचा प्रश्नच नाही बीडचा माणूस जो सोशल मीडियाचा नेता तो मनात येईल त्याविषयी बोलतो. तोही सोशल मीडियावर मग मुख्यमंत्री असो, पंतप्रधान असो की अमेरिकेचा राष्ट्रपती असो. त्याच्यावर वाटेल ते व्यक्त होताना दिसतात. गोरगरीब मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी समाजाचा एक लढावय्या उपोषण करतो त्या उपोषणाला राज्यभरातून ▶▶ पान २ वर



cmyk

## अग्रलेख

# सरकारसमोर पेच !

मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण द्यावे या मागणीसाठी मनोज जरांगे-पाटील मुंबईत दाखल झाले आहेत; तीन दिवसांपासून ते उपोषणाला बसले असून, राज्यभरातून मराठा बांधव मुंबईच्या दिशेने येत आहेत. मुंबई म्हटले की गर्दी असते त्यात गणेशोत्सव सुरू अन वर मराठा आरक्षणाचे आंदोलन सुरू. आंदोलनाची तीव्रता आता आणखी वाढण्याची शक्यता आहे. पाटील आरक्षणाशिवाय दुसरे काहीच बोलू नका म्हणत आहेत तर सरकार थेट आरक्षणावर निर्णय घ्यायला तयार नाही, अशावेळी आंदोलकासमोर नाही तर सरकार समोर मोठा पेच निर्माण झाला आहे .

या आंदोलनापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देता येणार नसल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. मराठा समाजाला कायदेशीर आणि घटनात्मकदृष्ट्या कुणबी मानले जाऊ शकत नाही. लोकशाहीमध्ये प्रत्येकाला आंदोलन करण्याचा हक्क आहे. जोपर्यंत मोर्चे आणि आंदोलन लोकशाहीच्या मार्गाने केले जातात तोपर्यंत आम्हाला काहीच हरकत नाही. आम्हीही त्याच लोकशाही भावनेने त्यांना प्रतिसाद देऊ; पण मराठा समाजाला आरक्षण मिळाल्यानंतरही हे आंदोलन पुन्हा का सुरू झाले आहे, हे मला समजत नाही. मराठा आणि कुणबी एकच असल्याचा दावा सरकारकडे आला होता; पण कायदेशीर आणि घटनात्मकदृष्ट्या ते असे मानले जाऊ शकत नाहीत. ओबीसीमध्ये आधीच ३५० समुदाय आहेत. मराठ्यांना या यादीत समाविष्ट केल्यास आधीच ओबीसीमध्ये असलेल्यांवर अन्याय होईल. मराठा समाजाला स्वतंत्रपणे १० टक्के आरक्षण देण्यात आलेले आहे. अशा वेळी मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण दिले जाणार नाही, असे मुख्यमंत्री फडणवीस यांचे स्पष्ट मत आहे.

सरकारने मराठा समाजाला सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग (एसइबीसी) श्रेणी अंतर्गत आधीच स्वतंत्र आरक्षण दिले आहे. या शिवाय ते राज्य आणि केंद्र स्तरावर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (इडब्ल्यूएस) कोट्यासाठीदेखील पात्र आहेत. आम्ही आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या मराठा समाजाच्या उन्नतीसाठी विविध उपाययोजना करण्यास तयार आहोत; पण त्यांना ओबीसी श्रेणीत समावेश करून राजकीय आरक्षण दिले जाऊ शकत नाही. आम्ही चर्चेसाठी तयार आहोत; पण मराठा समाजाच्या सदस्यांनी हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की, एसइबीसी आणि इडब्ल्यूएस त्यांना ओबीसीपेक्षा जास्त फायदे देतात, आकडेवारी हे सिद्ध करते. अशी भूमिका सध्या तरी सरकारची दिसत आहे. दुसरीकडे, जरांगे-पाटील यांनी मराठा आणि कुणबी एकच असल्याचा पुनरुच्चार केला आहे. जर कुणब्यांचा ओबीसी यादीत समावेश केला जातो तर मराठ्यांना का वगळले जाते ? त्यांनी आंतरविवाह आणि समान चालीरिती यासारख्या सामाजिक आणि सांस्कृतिक संबंधांचा हवाला दिला आहे. या दोघांचे दावे वेगवेगळे असले तरी मराठा आणि ओबीसी या दोघांसाठी सरकार काम करणार आहे. मराठा असो वा ओबीसी समाज, कोणावरही अन्याय होऊ देणार नाही.

मराठा समाजाचे हजारो कार्यकर्ते आझाद मैदानावर जमले आहेत. 'एक मराठा, लाख मराठा', 'आरक्षण आमच्या हक्काचे, नाही कुणाच्या बापाचे' अशा घोषणा सुरू आहेत.

मी गोळ्या झेलण्यास तयार आहे; पण आरक्षण मिळेपर्यंत हटणार नाही, असा जरांगे यांनी व्यक्त केला आहे.

माझ्या प्रकृतीची काळजी नाही, समाजाच्या वेदनेसमोर ते गौण आहे, असेही ते म्हणाले आहेत.

सद्यस्थितीत मराठ्यांच्या नाराजीचा धोका सरकार पुढे निर्माण झाला आहे. दररोज आंदोलकांची संख्या मुंबईत वाढत असून, आंदोलनाला आता तीव्र धार येण्याची शक्यता आहे. पाटलांनी सुद्धा याबाबत तसेच संकेत दिले आहेत. शिंदे समितीने कुणबी नोंदीबाबत दिलेला अहवालही जरांगे पाटलांनी फेटाळून लावला. गॅझेटमध्ये कुणबींची संख्या स्पष्टपणे नमूद आहे केवळ आकडेवारी नाही. सरकार मराठा समाजाला मूर्ख समजत असल्याचा आरोप त्यांनी केला. आंदोलकांनी संयम आणि शांतता राखावी, नियमांचे पालन करावे तसेच कोणत्याही चुकीमुळे समाजाच्या तोंडाशी आलेला घास हिरवला जाऊ नये, असे आवाहन त्यांनी केले आहे मात्र या प्रत्येक आंदोलकावर जरांगे पाटील लक्ष ठेवू शकत नाहीत, त्यामुळे आंदोलन आता नेमके कोणते स्वरूप घेते याकडे लक्ष असेल. मात्र सध्या तरी सरकार समोर पेच निर्माण झाला असल्याचे दिसत आहे.

# लालबागच्या राजाचे दर्शन वादात, मानवाधिकार आयोगाकडे तक्रार

## सर्वसाधारण भक्तांच्या भावनांचा अनादर होत असल्याचा दावा

**मुंबई । प्रतिनिधी**

**राजधानी मुंबईतील लालबागचा राजा गणेशोत्सव पंडालात होणाऱ्या व्हीआयपी आणि नॉन व्हीआयपी दर्शनाच्या व्यवस्थेविरोधात महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाकडे औपचारिक तक्रार दाखल करण्यात आली आहे. मुंबईतील अॅड.आशीष राय आणि पंकज मिश्रा यांनी ही तक्रार आयोगासमोर दाखल केली. त्यांचा आरोप आहे की, सार्वजनिक उत्सव असूनही दर्शनासाठी व्हीआयपी आणि नॉन व्हीआयपी अशी वेगळी रांग लावून सर्वसाधारण भक्तांच्या भावनांचा अनादर होत आहे. तसेच सर्वसामान्यांना तासन तास रांगेत उभे राहावे लागते, तर काही मोजक्यांना विशेष सवलत मिळते, हे मूलभूत हक्कांचे उल्लंघन आहे, असे आयोगाकडे दाखल तक्रारी म्हटले आहे.**

तक्रारदारांनी आयोगाकडे मागणी केली आहे की, गणेशोत्सव हा लोकउत्सव असल्याने दर्शन सर्वांसाठी समान आणि सुलभ असावे. दर्शन व्यवस्थेत भेदभाव टाळावा आणि सामान्य भाविकांना न्याय द्यावा. मानवाधिकार आयोगाने या तक्रारीची दखल घेऊन पुढील सुनावणीसाठी संबंधितांना नोटीस पाठविण्याची शक्यता आहे. ही कारवाई झाल्यास, राज्यातील इतर गणेश मंडळांच्या दर्शन व्यवस्थांवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, सध्या मुंबईत एकीकडे मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे गर्दी झाली असून दसुरीकडे लालबागच्या राजाच्या दर्शनालाही मोठी गर्दी होत आहे. अनेक मराठा बांधव आंदोलनस्थळी भेट दिल्यानंतर लालबागच्या राजाचे दर्शन घेण्यासाठी जात आहेत. गणेशोत्सव काळात दर्शनासाठी भाविकांची विविध मंडळांत मोठी गर्दी असते. पुणे असो किंवा मुंबई भाविक गणपती बाप्पांच्या दर्शनासाठी तासन तास रांगेत उभे राहतात. त्यातच, मुंबईतील लालाबागच्या राजाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची चढाओढ असते. अगदी राज्याच्या कानाकोपऱ्यातून येथे दर्शनासाठी भाविक येतात. मात्र, लालबागचा राजा गणेश मंडळाने व्हिआयपी आणि नॉन व्हिआयपी अशी दर्शनरांग केल्यामुळे भक्तांमध्ये भेदभाव करण्यात आल्याचे दिसून येत आहे. व्हिआयपी रांगेतून मुंबईतील सेलिब्रिटी, राजकीय नेते, उद्योगपती आणि ज्यांचा तगडा वशिला आहे, ते लालबागच्या राजाचरणी सहजपणे नतमस्तक होतात. मात्र, सर्वसामान्यांना तासन तास रांगेत उभे राहूनही नीट दर्शन घेऊ दिले जात नाही. सोशल मीडियावर या दर्शनरांगेचे अनेक व्हिडिओ व्हायरल झाले आहेत. त्यामुळेच, मानवाधिकार आयोग नेमकं काय भूमिका घेते? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सकाळी गायब दुपारी विवाहितेचा मृतदेह विहिरीत आढळला

**तलवाडा प्रतिनिधी**

तलवाडा तहत राजुरी मळा येथील रहिवासी सोनाली बाळु वणवे या मुलींचा विवाह तलवाडा तहत जबुरावस्ती येथील अनिकेत गर्जे व सोनाली या दोघांचा दोन महिन्यांपूर्वी विवाह झाला होता सोनाली यांचे वडील बाळु महादेव वणवे यांच्या फिर्यादीवरून दिं.३१ / ८/२०२५ रोजी सकाळी अकरा वाजता तलवाडा पोलीस स्टेशन येथे मिसिग दाखल करण्यात आली होती परंतु मुलीचे राहत्या घरी स्वतःच्या घराच्या पाठीमागे विहिरीत दुपारी दोनच्या सुमारास सोनाली अनिकेत गर्जे वय वर्षे १९ यांचा मृत्यू देह विहिरीत आढळल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. या घटनेची माहिती मिळताच सपोनि मनोज निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक स्वापनिल कोळी,पोह मोसिन शेख, पोहा गरदे, पोहा नारायण काकडे, यांनी घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा केला आमच्या मुलीला सासू-सासरे व नवऱ्याने मारल्याचे घात पाताचा संशय आक्रोश सोनालीच्या आई , वडील, चुलते करीत होते विहिरीतून मुलीची बॉडी बाहेर काढून तलवाडा प्राथमिक आरोग्य केंद्रात सविच्छेदन करण्यासाठी दाखल करण्यात आले होते तलवाडा प्रथामिक आरोग्य केंद्रात सोनालीच्या नातेवाईकाने मोठी गर्दी केली होती शवविच्छेदन डॉ अक्षय खरवडे, डॉ पुजा शेळके, यांनी केले आहे. पुढील प्रक्रिया तलवाडा पोलीस स्टेशन येथे सुरू असल्याची माहिती मिळाली आहे.



# युपीएससी हुकलेल्या विद्यार्थ्यांना प्रतिभा सेतूद्वारे मिळणार मोठी संधी-पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली । वृतसंस्थत्त**

**अनेक तरुण कठोर परिश्रमाने युपीएससीची परीक्षा उत्तीर्ण होऊन यश मिळवतात, याच परीक्षेत हजारो तरुण खूप सक्षम असतात मात्र थोड्या फरकाने अंतिम यादीत पोहोचू शकत नाहीत. आता अशा हुशार विद्यार्थ्यांना प्रतिभा सेतू सारख्या प्लॅटफॉर्म द्वारे नामांकित खासगी कंपन्या नोकऱ्या देतील, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि.३१) केले.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मन की बात कार्यक्रमाच्या १२५ व्या भागात देशाला संबोधित केले. यावेळी पंतप्रधान मोदींनी काश्मीरमधील सामने, यूपीएससी परीक्षा, डोंगराळ भागात झालेला विनाशकारी पाऊस आणि भूस्खलन अशा अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली. पंतप्रधान मोदींनी मन की बात कार्यक्रमाची सुरुवात नैसर्गिक आपत्तींपासून केली. डोंगरांमध्ये पाऊस आपत्ती बनला आहे. एनडीआरएफ आणि एसडीआरएफ पथकांसह सुरक्षा दलांनी सर्व शक्य मदत करण्यासाठी दिवसरात्र मेहनत घेतली आहे. सांगतानाचा त्यांनी बचाव कार्याचीही माहिती दिली. पंतप्रधान मोदी म्हणाले की, जम्मू आणि काश्मीरमधील २ महत्त्वाच्या घडामोडींचा उल्लेख केला. पुलवामाच्या स्टेडियममध्ये रॉयल प्रीमियर लीगच्या क्रिकेट सामन्यासाठी विक्रमी संख्येने लोक जमले होते आणि येथे दिवसरात्र क्रिकेट सामना खेळवण्यात आला होता. पूर्वी ते होणे अशक्य होते, मात्र आता देश बदलत आहे. देशातील पहिला खेलो इंडिया जल क्रीडा महोत्सव श्रीनगरमधील दल सरोवर येथे आयोजित करण्यात आला होता. संपूर्ण भारतातील ८०० हून अधिक खेळाडूंनी त्यात भाग घेतला होता. एक भारत श्रेष्ठ भारत आणि देशाच्या एकतेची भावना देशाच्या विकासासाठी खूप महत्वाची आहे. यामध्ये खेळांची मोठी भूमिका आहे, असेही पंतप्रधान म्हणाले. नागरी सेवा परीक्षेचा संदर्भ देत पंतप्रधान मोदी म्हणाले, अनेक तरुण कठोर परिश्रमाने युपीएससीची परीक्षा उत्तीर्ण होऊन यश मिळवतात. मात्र याच परीक्षेतील एक कटू सत्य म्हणजे हजारो तरुण खूप सक्षम असताना थोड्या फरकाने ते अंतिम यादीत पोहोचू शकत नाहीत. आता अशा हुशार विद्यार्थ्यांसाठी ''प्रतिभा सेतू'' नावाचे डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करण्यात आले आहे. या प्लॅटफॉर्मवर अशा १० हजारांहून अधिक तरुणांची माहिती आहे. या पोर्टलच्या मदतीने खासगी कंपन्याही हुशार उमेदवारांना नोकऱ्या देऊ शकतात.

# मनोज जरांगे यांची झुंड गोळा करून हुकूमशहाप्रमाणे वागणूक-लक्ष्मण हाके

**मुंबई । प्रतिनिधी**

**मनोज जरांगे यांच्या डोक्यावर परिणाम झाला आहे. ते संविधान, न्यायालय आणि शासन-प्रशासनाला मानत नाहीत. झुंड जमवून ते हुकूमशहासारखे वागत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेसमोर बसून ते समाजात दहशत निर्माण करत आहेत. त्यांचा इतिहास दंगलीचा आहे. त्यांना कायदा, लोकशाही आणि संविधानाची जाण नाही, अशी टीका लक्ष्मण हाके यांनी केली आहे. सरकारने जरांगे यांना मुंबईत येण्यापासून रोखायला हवे होते, असेही मत त्यांनी व्यक्त केले.**



मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी मुंबईतील आझाद मैदानात गेल्या तीन दिवसांपासून आंदोलन सुरू केले आहे. इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गातूनच मराठा समाजाला आरक्षण मिळावे, या त्यांच्या मागणीमुळे ओबीसी समाजात अस्वस्थता पसरली आहे. ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी जरांगे यांच्यावर जोरदार टीका करताना, त्यांच्या मागणीमुळे ओबीसी आरक्षण धोक्यात येईल, अशी भीती व्यक्त केली आहे. ते म्हणाले, जरांगे यांनी न्या. शिंदे समितीसोबत झालेल्या पहिल्या फेरीच्या चर्चेतून कोणताही तोडगा न निघाल्याने सरकारसमोर झुकणार नसल्याचा इशारा पत्रकार परिषदेत दिला आहे. यामुळे आंदोलक आणि ओबीसी समाजातील कार्यकर्ते अधिक आक्रमक झाले आहेत. हाके यांनी पुढे सवाल उपस्थित केला, जरांगे यांच्या मागणीमुळे ओबीसी आरक्षण संपेल, अशी भीती आहे. सरकारला खरेच ओबीसी आरक्षण संपवायचे आहे का? जरांगे यांना पाठिंबा देणाऱ्या नेत्यांनी आणि आमदारांनी आपली भूमिका स्पष्ट करावी. या घडामोडींमुळे मराठा आणि ओबीसी समाजातील तणाव वाढण्याची शक्यता आहे. सरकार यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पान ६ वरून...

### युसूफवडगांव शिवारातुन

समाजाला वेठीस धरण्याचे पाप केले आहे.एवढ्या मोठ्या संख्येने लोक तेथे गेले असल्याने सहाजिकच अन्नाची पाण्याची कमतरता जाणवु लागली होती.त्यामुळे आपल्या समाज बांधवांना कुठल्याही परिस्थितीत खाण्या-पाण्याची कमतरता भासु नये म्हणुन युसुफवडगांव, सादोळा, बावची, आनेगाव, माळेगाव, गोटेगाव व सोनेसांगवी प्रत्येक समाज बांधव व गावकरी यांनी आप आपल्या परिने होईल तशी मदत करत आहेत.आज या सर्व गावुन मुंबई येथील समाज बांधवांसाठी भाकरीची शिदोरी गोळा करून त्यांच्या सोयीसाठी तो तात्काळ टेम्पोने रवाना करण्यात आला आहे.

-----------

### सततच्या पावसामुळे पाटोदा

तालुक्यात गेल्या पंधरा ते वीस दिवसापासून सतत पडणाऱ्या पावसामुळे शेतकऱ्यांची खरीप पिकाची मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे शेतकरी पूर्णपणे कर्जबाजारी झाला आहे शेतीवर अवलंबून असल्याने शेतकऱ्यांना एकमेव उत्पन्नाचा मार्ग खरीप पिक तेही हातातून गेल्याने शेतकरी अहवाल दिन वर्थ आर्थिक मोठ्या संकटात सापडलेला दिसत आहे शेतकऱ्यांना आर्थिक आधार म्हणून शासनाने तालुक्यात झालेल्या शेतकऱ्यांच्या खरीप पिकाचे अनुष्काळीचे पंचनामे करावे व पंचनामाच्या आधारे राज्य सरकारने शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी व आधार द्यावा अशी शेतकऱ्याकडून मागणी होत आहे.

-----------

### आंतरराष्ट्रीय भारत गौरव

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदरणीय जितीन रहेमान, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, मेडल, शाल श्रीफळ देऊन सन्माननीत करण्यात आले.यावेळी नॅशनल अनिमल्स वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडिया चे सदस्य तथा गोसेवक संतोष गर्जे महाराज, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे, भटक्या विमुक्त विकास परिषदेचे देवगिरी प्रांत संयोजक उमेश जोगी, मातृभुमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ संजय तांदळे, भगवान पवार, बबन गिरी, ओमप्रकाश गिरी,भटक्या विमुक्त जाती परिषद महिला जिल्हा संयोजक माळी, सामाजिक कार्यकर्त्या मनिषा स्वामी, मसानजोगी समाजाचे जातपंचायत पंच हनुमंत मोरे इत्यादी मान्यवर मंडळींची उपस्थिती.

--------------

### अनिल राधे मित्र परिवाराच्या

अनिल राधे मित्र परिवाराच्या सर्व सदस्यांची उपस्थिती होती.

सत्काराने आमदार गोरखे भारावले

मातंग समाज भूषण आमदार अमित जी गोरखे हे आमदार झाल्यानंतर प्रथमच माजलगाव मतदारसंघात येत असल्याने भर पावसात त्यांच्या प्रतीक्षेत अनेक समाज बांधव उपस्थित होते. त्यामुळे भव्य दिव्य सत्कार सोहळ्याने आपण भारावून गेलो असल्याचे आमदार गोरखे यांनी सांगितले.

## पान १ वरून...

### गावागावातील शेत रस्त्यांचे

आहेत. यानुसार सर्व शेतरस्त्यांना विशिष्ट क्रमांक देऊन त्यांची नोंदणी करण्याचा उपक्रम हाती घेण्यात येणार आहे. यामध्ये प्रत्येक शेतरस्त्याला एक निश्चित क्रमांक दिला जाईल, ज्यामुळे त्या रस्त्याची ओळख स्पष्ट होईल. प्रत्येक गावातील ग्रामसेवक, ग्राम महसूल अधिकारी (तलाठी), महसूल सेवक (कोतवाल) व पोलिस पाटील यांनी सामूहिकपणे रस्त्यांची यादी तयार करावी लागणार आहे. त्यासाठी संबंधित ग्रामस्थांच्या मदतीने शिवार फेरी काढली जाणार आहे. भूमी अभिलेख विभागाच्या मदतीने या रस्त्यांचे सीमांकन केले जाणार आहे. तहसीलदारांकडून रस्त्यांची यादी प्राप्त झाल्यानंतर अतिक्रमण काढण्याची कारवाई देखील याच विभागाकडून केली जाणार आहे.

--------------

### आरक्षण घेतल्याशिवाय

घरी फक्त फडणवीस चहा पिऊन गेलेत तर मग पक्ष बरबाद झाला तरी चालतो, अशा शब्दात जरांगे यांनी राज ठाकरेंवर निशाना साधला. चंद्रकांत पाटील यांनी मुलांसाठी चांगल काम केले म्हणून त्यांच्यावर बोलायचे कमी केले होते. उपसमितीचे अध्यक्ष असताना मुख्यमंत्र्यांच्या सांगण्यावरून त्यांनी वैधता थांबवली होती, हे आम्हाला माहिती आहे. त्यांनी यापुढे शांत राहावे. मराठ्यांच्या शिव्या खाऊ नका, असा इशारा जरांगे यांनी मंत्री चंद्रकांत पाटील यांना दिला. सरकार मागण्यांची अंमलबजावणी करत नाही, त्यामुळे सोमवार पासून पाणी बंद करणार. सरकार कितीही अन्याय करू दे मराठा समजाने शांत रहावे, दगडफेक करू नका, तुम्हाला आरक्षण मिळवून दिल्याशिवाय मुंबई सोडणार नाही, असे आवाहन जरांगे यांनी आंदोलकांना केले.

-------------

### खा.सुळेंना आंदोलकांचा

आंदोलनास पाठिंबाही दिल्या. यानंतर त्या उपोषणस्थळावरुन निघाल्या. यावेळी आक्रमक झालेल्या काही आंदोलकांनी शरद पवारांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. तसेच खासदार सुळे यांना घेराव घातला. काहींनी पाण्याच्या बाटल्याही सुळे यांच्या कारकडे भिरकावल्या. अचानक घडलेल्या घटनेमुळे उपोषणस्थळी काही काळ प्रचंड तणाव निर्माण झाला. जरांगे पाटील यांची भेट घेतल्यानंतर माध्यमांशी बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, मराठा आरक्षण प्रश्नी राज्य सरकारने तत्काळ निर्णय घ्यावा. मराठा आरक्षण आंदोलनाबाबत सर्वपक्षीय बैठक बोलवण्यात यावी. गरज पडल्यास विधानसभेचे एक दिवसाचे विशेष अधिवेशन घेण्यात यावे, अशी मागणीही त्यांनी केली.

-----------

### बीडमध्ये बनावट नोटांचे

स्वत:च्या ताब्यातील बनावट चलनी नोटा खऱ्या असल्याचे घेऊन कॅश डिपॉझीट मशिनमध्ये टाकतांना त्याचा वापर करत असल्याचे आणि त्या नोटा घेऊन जात असतांनाचे सीसीटीव्हीमध्ये दिसुन आले आहे. त्याच्याकडून पाचशे रूपयांच्या सात नोटा अशा एकूण ३५०० रूपयांच्या नोटा जप्त करण्यात आल्या. या प्रकरणी आगम वैभव याच्या विरूध्द कलम १७९, १८०बीएनएस २०२३ प्रमाणे शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाअसून पुढील तपास पोउपनि काटकर करीत आहेत.प्रामुख्याने मागील कळत बीड शहर पोलिसांनी बनवत नोटा चलनात आणणारी टोळी पकडली होती त्यानंतर संभाजीनगर वाळूज भागातील एका बनावट नोटा छापण्याच्या गोदामावत छापा मारला असतात त्याठिकाणी देखील बीड कनेक्शन समोर आले होते आज घडलेल्या घटनेवरून हे रॅकेट पुन्हा सक्रिय झाल्याची भीती निर्मण झाली आहे.

------------

### लक्ष्मण हाके आणि मराठा

भिडण्याचा व्हिडीओ देखील समोर आला आहे. लक्ष्मण हाके आणि मराठा आंदोलक यांच्यात तू तू मैं मैं होताना दिसत आहे. नीराकडून लोणंदच्या दिशेने जात असताना निरा येथे चहा पिण्यासाठी थांबलेले असताना ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि मराठा आंदोलक भिडले. पुणे जिल्ह्यातील नीरा या गावी ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांना मराठा आंदोलक भेटले. हाके यांचा सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यामध्ये बोरी या गावी एक कार्यक्रम होता. त्यासाठी ते निघाले होते. पण नीरा येथे थांबले असताना लक्ष्मण हाके यांच्यासमोर काही मराठा आंदोलक आले आणि त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी लक्ष्मण हाके यांनी थेट रस्त्यावर बसूनच या सगळ्या विरोधी आंदोलनाचा निषेध व्यक्त केला. यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत काही तरुणांना ताब्यात घेतले.

------------

### शरद पवारांच्या

म्हणजे अनेक लोकप्रतिनिधी मनोज जरांगे यांची भेट घेऊन येत आहेत. पण सुप्रिया सुळे यांनाच अशाप्रकारे वागणूक का दिली गेली? असा प्रश्न उपस्थित होतोय. दरम्यान, सुप्रिया सुळे यांच्यासोबत घडलेल्या घटनेनंतर मुंबई पोलिसांनी सुरक्षा वाढवली आहे. मुंबई पोलिसांची कुमक आझाद मैदानात आहेच, पण ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या मुंबईतील निवासस्थान असलेल्या 'सिल्व्हर ओक' घराबाहेरही पोलिसांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. कोणत्याही प्रकारची अनपेक्षित घटना घडू नये यासाठी पोलिसांकडून काळजी घेतली जात आहे.

------------

### परळी रेल्वे स्थानकात पाच

आईला झोप लागली व मुलगी तिच्या अवतीभवतीच चकरा मारत होती. याच दरम्यान एकटी मुलगी बघून अज्ञात हैवानी वृत्तीच्या व्यक्तीने तिला त्या ठिकाणाहून नेले व गैरकृत्य केले. पाच वर्षीय बालिकेवर बलात्कार करून हा अज्ञात हैवान तिथून पसार झाला. ही मुलगी रडत तिच्या आईकडे आल्यानंतर तिच्या आईने काय झाले याचा शोध घेतला असता तिच्या गुप्तांगातून रक्तस्राव बघून तिच्यावर गैरप्रकार झाल्याचे तिच्या लक्षात आले. या पीडित बालिकेला परळीच्या उपजिल्हा रुग्णालयात तपासणीसाठी आणण्य आले आहे. पोलिसांनी घटनेचा तपास सुरू केला आहे. दरम्यान परळी रेल्वे स्थानक परिसर हा गुन्हेगारांचा अड्डा बनण्याचे दिसून येत आहे मागच्या पंधरावड्यात हैदराबादहून मुंबईला जाणाऱ्या एका तरुणीला रेल्वेपरिसरातून फूस लावून पळवून त्याच्यावर अत्याचार झाला होता. रेल्वे पोलीस आणि स्थानिक परळी पोलिसांनी अशा गुन्हेगारांचा बंदोबस्त करण्याची गरज आहे.

---------

### ओबीसीतून आरक्षणाला

आहे. मात्र आपल्या इथं सोशल फॅब्रिकचाही प्रश्न आहे. तसंच कोर्टाचेही काही निर्णय आले आहेत, त्या निर्णयांचा आपल्याला अवमान करता येणार नाही. त्यामुळे जे काही कायद्याच्या चौकटीत बसतं, ते निर्णय घेण्यासाठी सरकार तयार आहे. परंतु कायद्याच्या चौकटीच्या बाहेर जाऊन असाच निर्णय घ्या, असं कोणी म्हटलं तरी आणि सरकारने त्यांना खूश करण्यासाठी असा निर्णय घेतला तरी तो एकही दिवस टिकणार नाही. तसंच मराठा समाजामध्ये फसवणूक झाल्याची भावना तयार होईल. त्यामुळे राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ उपसमितीची या सगळ्याबाबत चर्चा सुरू आहे. आमची राज्याच्या महाधिवक्त्यांसोबत चर्चा सुरू आहे. कायदेशीर सल्लागारांसोबत चर्चा सुरू आहे,'' अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली आहे.

-------------

### धन्य तुम्ही ! कार्यकर्त्यांनी मुंबईलाच बीड केले

सपोर्ट मिळत आहे. मुंबईत दाखल झालेल्या आंदोलनात बीड जिल्ह्यातून सर्वाधिक संख्या पाहायला मिळत आहे. आरक्षणाची मूळ मागणी जरांगे पाटील ठासून सांगत आहेत पण इकडे कार्यकर्ते काय करतात हे चित्र अख्खी मुंबई आणि राज्य डोळ्याने सोशल मीडियावर पाहत आहे. बीडमध्ये जी पद्धत कार्यकर्त्यामध्ये आहे, एकमेकांच्या समाजावर, समाजाच्या नेत्यावर नको ते आरोप करण्यात मग्न असते आणि हे सर्व सोशल मीडियाच्या माध्यमातून दिसून येते. नको ती स्टंटबाजी जिल्ह्यात होते आणि हो व्हिडिओ व्हायरल करण्याची पद्धत मात्र बीड सारखी कुठेच पहावयास भेटणार नाही. पण देवबाप्पा खरं सांगतो, बीडला नूतन पोलीस अधीक्षक आल्यापासून जरा याला आळा बसला पण आता हीच पद्धत मुंबईत सुरू झाली आहे तीही आमच्या बीड करामुळे. ही काही गर्वाची बाब नाही परंतु कार्यकर्त्यांनाच हे कळाले पाहिजे. आपण ज्या मागणीसाठी मुंबईत जरांगे पाटलाच्या एका आवाहनावर आलो आहोत, त्याचे गांभीर्य लक्षात घेतले पाहिजे. ज्याकडे फोकस पाहिजे तिकडे मात्र फोकस केला जात नाही कार्यकर्ते रास्ता रोको, ट्रॅफिक जाम, रस्त्यावर आंघोळ आदी बाबी सोशल मीडियावर व्हायरल करत आहेत त्यातही बिडकरच पुढे आहेत. एवढेच काय पण जरांगे पाटलांना जाऊन भेटणारे लोकप्रतिनिधी देखील बीडकरच जास्त आहेत, त्यामुळे जरांगे पाटलाच्या आंदोलनामुळे मुंबईलाच बीड केले असल्याचे चित्र सध्या तरी दिसत आहे. आंदोलनात आलेले अनेक कार्यकर्ते मुख्यमंत्री असो की अन्य मंत्री यांच्यावर आक्षेपार्ह विधान करताना दिसतात. अशा वेळी संयम महत्त्वाचा असतो पण सांगणार कोण ? एका समाजाच्या न्यायासाठी दुसऱ्या समाजाला टार्गेट करणे हे योग्य नसले तरी बोलणाराला योग्य वाटत असावे. परंतु देवबाप्पा आज एका समाजाने मागणी केली, उद्या दुसरा समाज करणारच यात शंका नाही. हा प्रशासनाचा भाग आहे यावर आपल्याला नाही बोलता येणार पण देवबाप्पा आपण बुद्धी देवता आहात सरकारला आणि इतरांना सुबुद्धी दिली तर प्रश्न सुटू शकेल, पण तसे होताना दिसत नाही. आंदोलन करताना पिण्याचे पाणी, जेवण यासाठी मोठी अडचण निर्माण होत आहे, ते देखील सरकारने जाणीवपूर्वक केल्याचा आरोप होत आहे. असे असताना बीड जिल्ह्यातून असंख्य भाकरी मुंबईला पोहोचवत आहेत यातही सोशल मीडियावर तथाकथित नेते ज्यांना फार काही शिक्षणाची अट नसते असे मात्र ज्ञान पाजळत आहेत. माणुसकीच्या नात्याने पाठवलेल्या भाकरी तो पाठवणारा कोणत्या जातीचा आहे म्हणून त्याचा उल्लेख केला जातो. मानवतेच्या धर्मातून ही मदत केली जाते मग अशावेळी अमुक जातीच्या व्यक्तीने भाकरी पाठवल्या असा उल्लेख करण्याची गरज नाही. यातून द्वेष कसा पसरवला जातो हाच संदेश समाजापुढे जात आहे आणि हे सर्व करणारे दुसरे तिसरे कोणी नाही. ते बीड जिल्ह्यातीलच सोशल मीडिया नेते आहेत. बीड जिल्ह्यामध्ये काय चालते, कसे चालते याचाच प्रत्यक्ष प्रदर्शन हे सोशल मीडियावरील तथाकथित लोक मुंबईत करत असल्याने यांनी मुंबईलाच बीड बनवले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. पण आंदोलक मोठ्या संख्येने आहेत, त्यांनी कोठे आंघोळ करायची, खायचे काय, झोपायचे कुठे हा देखील मोठा प्रश्न आहे. जागा मिळेल तिथे झोपतात जागा मिळेल तिथे आंघोळ करतात. यात चूक काहीच नाही, पण त्याचे भांडवल करून प्रदर्शन दाखवणे हे योग्य वाटत नाही, पण गणराया या सर्वांना सुबुद्धी दे त्यांच्या कृत्य आणि वागण्यातून कोणी दुःखी होणार नाही याची काळजी देवबाप्पा आता तुम्हालाच घ्यावी लागेल. कारण तुमचे हे सोशल मीडियावरील भक्त आपण कसे वेगळे आहोत, हे दाखवण्याचा प्रयत्न होत आहे.

-----------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. १ सप्टेंबर २०२५



## थोडक्यात...

### मांजरा प्रकल्पातून ६९८८ क्युसेक्स विसर्ग सुरू

केज । प्रतिनिधी

मांजरा धरण पाणलोट क्षेत्रात पडत असलेल्या पावसामुळे व धरण पाणी पातळी नियंत्रित करण्याचे दृष्टीने दि. ३१/०८/२०२५ रोजी १६.०० वाजता गेट क्रमांक १ व ६ (हे २ गेट) मध्ये ०.२५ मीटरने वाढ करण्यात आली आहेत. सद्यस्थितीत मांजरा धरणाच्या सांडव्याची २ वक्रद्वारे (क्र.१ व ६) ०.५० मीटर आणि ४ वक्रद्वारे (क्र. २, ३, ४ व ५) ०.२५ मीटर ने चालू असून मांजरा नदीपात्रात ६९८८.५५ क्युसेक्स (१९७.९२क्युमेक्स) इतका विसर्ग सूरू आहे. धरणामध्ये येणारी पाण्याची आवक पाहून विसर्ग वाढवणे/कमी करणे बाबत निर्णय घेण्यात येईल. तरी, नदी काठावरील/पुरामुळे बाधित होणाऱ्या गावातील नागरीकांनी खबरदारी घ्यावी.असे आवाहन मांजरा प्रकल्प धनेगाव पुरनियंत्रण कक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

### माजलगाव धरणातून ९९२५ क्युसेक्स विसर्ग सुरू

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव धरण पाणलोट क्षेत्रात पडत असलेल्या पावसामुळे व धरण पाणी पातळी नियंत्रित करण्याचे दृष्टीने दि. ३१/०८/२०२५ रोजी १८:०० वाजता माजलगाव धरणाचे वक्रद्वार क्र. ९ व १३ हे आणखी २ वक्रद्वारे ०.५० मीटरने उघडुन विसर्ग वाढविण्यात आला आहे.

सद्यस्थितीत माजलगाव धरणाच्या सांडव्याची ५ वक्रद्वारे (क्र.११, ६, १६, ९ व १३) ०.५० मीटरने चालू असून सिंधफणा नदीपात्रात ९९२५.८१ क्युसेक्स (२८१.०६ क्युमेक्स) इतका विसर्ग सूरू आहे. धरणामध्ये येणारी पाण्याची आवक पाहून विसर्ग वाढवणे/कमी करणे बाबत निर्णय घेण्यात येईल. तरी, सिंधफणा व गोदावरी नदी काठावरील/पुरामुळे बाधित होणाऱ्या गावातील नागरीकांनी खबरदारी घ्यावी आणि सतर्क व सूरक्षीत स्थळी रहावे.असे आवाहन माजलगाव प्रकल्प पुरनियंत्रण कक्षाकडून करण्यात आले आहे.

# भाजपाचा पहिला आ. सुरेश धस मनोज जरांगेच्या भेटीला

**आष्टी । प्रतिनिधी**

**मराठा आरक्षण संदर्भात मुंबई आझाद मैदानावर संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरु आहे.या उपोषणाला भाजपाचा पहिला आमदार म्हणून सुरेश धस यांनी भेट देऊन,आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोलून लवकरात लवकर तोडगा काढण्याबाबत बोलणार असल्याचे आ.धस यांनी सांगितले.**



गेल्या दोन दिवसांपासून संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांनी लाखो मराठा सेवकां समवेत अंतरवली ते मुंबई जात आज आझाद मैदानावर मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून बेमुदत उपोषण सुरू केले आहे.या आंदोलनाला राष्ट्रवादी काँग्रेस, कॉग्रेस,शिवसेना या पक्षाच्या आमदार खासदारांनी पाठिंबा दिला.परंतु अजून भाजपाच्या कोणत्याच आमदार खासदारांनी पाठिंबा तर सोडा साधी भेट ही घेतली नाही.परंतु आज शुक्रवार दि.२९ रोजी रात्री ८.४५ वा.स्वत: आमदार सुरेश धस यांनी उपोषणस्थळी जाऊन आंदोलक मनोज जरांगे यांची भेट घेऊन आरक्षणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लवकरात लवकर तोडगा काढण्याबाबत बोलणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आ.धसांचे संपुर्ण कुटुंब आंदोलनात

मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून मनोज जरांगे यांनी सुरू केलेल्या आंदोलनाला आमदार सुरेश धस यांनी सुरूवातीपासूनच पखठिंबा दिला आहे.दि.२७ रोजी आमदार धस यांचे बंधू देविदास धस यांनी हजेरी लाऊन सर्वांना सुरक्षित जाण्याचे आवाहन केले.आज शुक्रवारी दुपारी पुत्र जयदत्त धस ह्यांनी जरांगे पाटील यांची भेट घेऊन चर्चा केली.तर पुतण्या राधेश्याम धस हे आंदोलनात गावक-यांन समावेत सहभागी झाले तर त्यांचे सर्व शिलेदार देखील आंदोलकांच्या सेवेत असलेले पाहायला मिळाले.

## संतश्री गुरूलिंग स्वामी पुण्यतिथी महोत्सवास भाविकांची उपस्थिती



### आशिष चौधरी यांच्या हस्ते आरती व पुजा संपन्न

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

वीरशैव समाज परळीच्या वतीने संतश्री गुरूलिंग स्वामी यांचा १२४ वा पुण्यतिथी महोत्सव आणि अखंड शिवनाम सप्ताह बुधवार दिनांक २७ ऑगस्ट पासून भाविक भक्तांच्या मोठ्या उपस्थितीत उत्साहात सुरू झाला आहे. मंगळवार दिनांक २ सप्टेंबर रोजी श्री सदगुरू १०८ सिद्धलिंग शिवाचार्य महाराज साखरखेर्डेकर यांच्या आशीर्वाचनाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभात श्री संतश्री गुरूलिंग स्वामी व संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या प्रतिमांचे विधीवत पूजन दैनिक महाराष्ट्र टाइम्स छत्रपती संभाजीनगर आवृत्तीचे उपसंपादक श्री व सौ आशिष शंकरअप्पा चौधरी श्री व सौ अविनाश शंकरअप्पा चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास भाविकांची मोठी गर्दी झाली असून, प्रत्येक वर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा अखंड शिवनाम सप्ताह, पालखी सोहळा, भंडारा अशा पारंपारिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हे सर्व कार्यक्रम २ सप्टेंबरपर्यंत आयोजित केले जातील. श्री सदगुरू १०८ सिद्धलिंग शिवाचार्य महाराज साखरखेर्डेकर यांच्या उपस्थितीत दत्ताप्पा ईटके गुरूजी व समस्त विश्वस्त मंडळाच्या अध्यक्षतेखाली हा महोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात होत आहे.

सप्ताहात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ७ ते ८ वाजता शिव सहस्त्रनामावली, सकाळी ९ ते ११ वाजता परम रहस्य व श्री पलसिद्ध महात्म्याचे पारायण, सकाळी १०.३० ते १२ वाजता श्री मन्मथ स्वामी गाथावरील भजन, दुपारी ३ ते ५ वाजता शिव पाठ आरती व सायंकाळी ५.३० ते ६.३० वाजता धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले आहे. परम रहस्याचे पारायण प्रमुख शि.भ.प. श्री दयानंद अण्णा चौधरी हे करीत आहेत.



**दिंद्रुड:– श्री शार्दुलेश्वर शिक्षण संस्था माजलगाव संचलित रेणुबाई देवी विद्यालय देवडी चे शिक्षक श्री. अंगद शिंगणे सर हे सेवानिवृत्त झाले असता त्यांचा सहपत्नी सत्कार खोलेश्वर परिवाराचे संस्थापक अध्यक्ष दिलीपराव पारेकर, उपाध्यक्ष प्रकाश कुलकर्णी, संचालक प्रताप शेंडगे,गणेश काशीद सर, पांडुरंग वाकसे सर,रोहिणी पारेकर मॅडम,विलास पारेकर, व खोलेश्वर कर्मचारी या सर्वांच्या उपस्थित करण्यात आला.**

## सय्यद गुरुजी साहित्य अकादमीतर्फे शिक्षक दिनी भेट पुस्तकांचे दुसरे वर्ष

आष्टी । प्रतिनिधी



सय्यद अमीनोद्दीन मास्टर उर्फ सय्यद गुरुजी यांच्या नावे सय्यद गुरुजी साहित्य अकादमीच्या वतीने दरवर्षी शिक्षक दिनी एका शाळेला,लहान मुलांना आवडतील अशा ५१ पुस्तकांची भेट देण्याचा संकल्प सन २०२४ पासून सुरू करण्यात आला आहे.सय्यद गुरुजी यांचे मूळ गाव,मौजे चिंचाळा.या गावी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेपासून याची सुरुवात झाली.आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा, धामणगाव, हिवरा, मांडवा,बेलगाव,आष्टी या गावी जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून सय्यद गुरुजी यांनी सेवा केली.यावर्षी आष्टीच्या जिल्हा परिषद मुलांच्या माध्यमिक शाळेला शिक्षक दिनाच्या निमित्ताने पुस्तकांची भेट देण्यात येणार आहे.दिनांक पाच सप्टेंबर रोजी ईद-ए-मिलाद असल्याने हा कार्यक्रम ४ सप्टेंबर रोजी होणार आहे.असे सय्यद गुरुजी यांचे चिरंजीव कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन यांनी सांगितले.त्यांचे इयत्ता दहावी पर्यंतचे शिक्षणही या शाळेतच झाले आहे.

## राष्ट्रसाधना पुरस्काराने सामाजिक कार्यकर्ते संतोष गर्जे सन्मानित

**पाटोदा । प्रतिनिधी**

मुंबई येथील नामांकित ज्ञान उदय फाऊंडेशन मिरा भाईंदर या संस्थेच्या वतीने पाटोदा येथील रोटी बॅंकेचे संचालक तथा सामाजिक कार्यकर्ते संतोष गर्जे यांना राष्ट्रीय स्तरावरील राष्ट्रसाधना पुरस्काराने दिनांक २८ जून २०२५ रोजी भारतरत्न गाण सम्राज्ञी लता मंगेशकर नाट्यगृहामध्ये गौरविण्यात आले.

पुरस्कार वितरण सोहळ्याचे मुख्य अतिथी सुभेदार श्री कुणालजी मालुसरे ( तानाजी मालुसरे यांचे वंशज ) , डॉ विजय दहिफळे, सुरेंद्रकुमार, कौशिक गायकवाड, पंडित ब्रिज नारायण राष्ट्रपती पदक विजेते, डॉ क्रांती महाजन, आचार्य प्रणव कुमार शास्त्री यांच्या हस्ते समाजसेवेतील उल्लेखनीय कार्याबद्दल संतोष गर्जे यांना राष्ट्रीय स्तरावरील राष्ट्रसाधना पुरस्काराने गौरविण्यात आले.

पाटोदा शहरात मागील ५ वर्षांपासून रोटी बॅंकेच्या माध्यमातून गोरगरीब जवळपास १०० निराधारांना एक वेळेचे दुपारचं जेवण पाटोदा बस स्थानक येथे दिलं जातं आहे. यांची दखल घेऊन राष्ट्रीय स्तरावरील ज्ञान उदय फाऊंडेशन ने राष्ट्रीय स्तरावरील राष्ट्रसाधना पुरस्काराने त्यांना सन्मानित केले आहे याबद्दल महासांगवी येथील संत मिराबाई आईसाहेब संस्थान च्या मठाधिपती हभप राधाताई आईसाहेब महाराज यांनी संतोष गर्जे यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला यावेळी उपसरपंच केशव गर्जे, जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती महेंद्र गर्जे, भाजप नेते मधुकर गर्जे, संतोष शिंदे, प्रा. अशोक नागरगोजे, दिपक गर्जे, स्वामी सानप, शिवाजी गर्जे, पाचेगाव चे सरपंच रविंद्र थोरात, पाटोदा तालुक्यातील गोशाळा संचालक नामदेव जगदाळे, रामहरी जाधव, मनोज चौरे व सागर तुपे पाटोदा पोलीस स्टेशन चे सहाय्यक निरीक्षक भगवान भाब्बड सह मित्र परिवार व रोटी बॅंकेच्या लाभार्थींनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले, व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## मार्शल आर्ट असोसिएशनचा कराटे बेल्ट वितरण सोहळा

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव येथे कराटे हॉलमध्ये दिनांक २८ ऑगस्ट २०२५ रोजी कराटे बेल्ट वितरण सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. संजय बागुल सर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माननीय दीपक भालेराव (उपविभागीय अधिकारी, माजलगाव), माननीय नवनाथ सिंगारे (केंद्रीय मुख्याध्यापक, सादोळा) तसेच माननीय शेख चांद (हाजी) उपस्थित होते.





माजलगाव शहरात तब्बल ३५ वर्षांपासून चंद्रमणी डोंगरे सर कराटेचे प्रशिक्षण देत असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी पोलीस भरती, मिलिटरी, नेव्ही व आर्मीमध्ये निवड झालेले आहेत. विद्यार्थ्यांना वाईट बेल्टपासून ब्लॅक बेल्टपर्यंत पोहोचण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतात. या बेल्ट परिक्षेत ५० विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यामध्ये येलो, ऑरेंज, ग्रीन, रेड, ब्लू व ब्राऊन बेल्टचे वितरण करण्यात आले.सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील कराटे वर्गामध्ये आर्चरी, स्टिक, न नॉचाक्स, योगा, मेडिटेशन, सेल्फ डिफेन्स व सुसंस्कार अशा अनेक उपक्रमांचे प्रशिक्षण दिले जाते.

अध्यक्षीय भाषणात प्रा. बागुल यांनी विशेषत मुलींसाठी सेल्फ डिफेन्सचे महत्व पटवून दिले. प्रमुख पाहुणे श्री. दीपक भालेराव यांनी बेल्टचे शिस्तबद्ध आयुष्याशी असलेले नाते समजावून सांगितले. तर श्री. शेख चांद यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमात ब्लॅक बेल्टधारक विद्यार्थ्यांनी अमोल पुडगे, अभिजीत राठोड, रोहन किरवले, यशवंत पवनराजे सोळंके, सक्राते मयुरेश अस्वले, अपूर्वा कांबळे व श्रुती शिरशेवार) प्रभावी डेमो टेशन सादर केले.

तसेच औरंगाबाद येथे झालेल्या एस.आर.पी. मिलिटरी व पोलीस प्रशासन प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी झालेल्या सार्थक डोंगरे, अभिजीत राठोड व प्रीती प्रधान यांचा सत्कारही करण्यात आला. नाशिक येथे झालेल्या कराटे चॅम्पियनशिपमध्ये माजलगावच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवत द्वितीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेत २२ सुवर्ण, १२ रौप्य व ५ कांस्य पदक पटकावून माजलगावच्या कराटे मार्शल्सनी शहराचे नाव उंचावले. या यशाबद्दल आमदार माननीय प्रकाशदादा सोळंके व जयसिंग भैय्या सोळंके यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रीती प्रधान यांनी केले तर आभार प्रदर्शन सार्थक डोंगरे यांनी मानले.

## चिंचवण ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने महाराणी ताराबाई विद्यालयात एड्स जनजागृती अभियान

वडवणी।प्रतिनिधी

इंटेन्सिफाइड अवेअरनेस कॅम्पेन अंतर्गत ग्रामीण रुग्णालय चिंचवणचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.श्री.करमाळकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष जिल्हा रुग्णालय बीड आणि एकात्मिक समुपदेशन व चाचणी केंद्र (आयसीटीसी सेंटर) ग्रामीण रुग्णालय चिंचवण यांच्या वतीने वडवणी शहरातील, महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात किशोरवयीन मुला-मुलीं करिता एचआयव्ही / एड्स जनजागृती अभियानाचे आयोजन दि.३० ऑगस्ट २०२५ शनिवार रोजी करण्यात आले होते.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती शोभाताई आंधळे-डोईफोडे मॅडम तर प्रमुख पाहुणे म्हणून चिंचवण ग्रामीण रुग्णालयातील आयसीटीसी सेंटरचे समुपदेशक श्री.प्रसाद ठोसर सर तसेच विद्यालयाचे उपप्राचार्य मस्के सर, पर्यवेक्षक श्री.धाईतिडक सर मान्यवर म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तथा समुपदेशक श्री.प्रसाद ठोसर यांनी किशोरवयीन मुला-मुलींना समुपदेशन करताना त्यांनी २०१७ च्या कायद्याविषयी आणि १०९७ या टोल फ्री नंबर विषयी माहिती दिली व एसटीआय वयानुसार होणारे शारीरिक बदलाविषयी माहिती देऊन अवयव दाना विषयी माहिती दिली तसेच आयइसीचे विद्यार्थ्यांना वाटप करून एचआयव्ही / एड्स या आजाराविषयी जनजागृती त्यांनी केली तसेच अध्यक्षीय समारोपर विचार प्राचार्या श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम यांनी व्यक्त करून कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल आभार मानले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे उपप्राचार्य मस्के सर यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अंडील जी.पी.यांनी केले तसेच उपस्थितांचे आभार क्रीडा शिक्षक निवरकर सर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

# हिंद की चादर निमित्त पोहरादेवी येथे राज्यस्तरीय चर्चासत्र

## धर्मगुरू आ.बाबुसिंग महाराज,शदरजी ढोले रामेश्वरभाऊ नाईक यांचा सहभाग

**तलवाडा प्रतिनिधी**

**हिंद की चादर श्री गुरु तेगबहादुर साहिबजी यांची ३५० वी समागम निमित्त राज्यस्तरीय महाचर्चासत्र वाशीम जिल्ह्यातील बंजारा तिर्थक्षेत्र पोहरादेवी येथे रविवारी आयोजित करण्यात आला आहे.**

या चर्चासत्राच्या निमित्ताने बंजारा धर्मगुरू आ बाबुसिंगजी महाराज,राष्ट्रीय स्वयंसेवक संघ धर्म जागरण अभियानचे प्रमुख शरदरावजी ढोले साहेब,महेंद्रजी रायचुरा साहेब,मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे प्रमुख तथा गोदरी कुंभमेळ्याचे संयोजक रामेश्वर भाऊ नाईक व बंजारा तीर्थक्षेत्र बारा धामचे निर्माते भगवंत सेवक किसनभाऊ राठोड यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.याच कार्यक्रमांमध्ये महायुती सरकारचा महत्त्वाकांक्षी अभियान भटके विमुक्त दिवस देखील साजरा करण्यात येणार आहे.या दोन्ही कार्यक्रमाला बंजारा भटके मुक्त भाजपा व विविध संघटनेच्या नेते पदाधिकारी कार्यकर्ते यांनी उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे इंग्रजांच्या जोखडातून मुक्ती मिळाल्यानंतर १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले,हे खरं असलं तरी या देशातील करोडोंच्या संख्येने असणारे व जगण्यासाठी रोज मरण यातना भोगत असलेल्या भटके विमुक्तांना ३१ ऑगस्ट १९५२ म्हणजे तब्बल पाच वर्षे उशिरा देशातील अन्यायकारक व्यवस्थेच्या जोखडातून स्वातंत्र्य मिळाले आहे. हि ऐतिहासिक आठवण जागवणारा दिन यावर्षी भाजपा-महायुती सरकारने भटके विमुक्त दिवस म्हणून राज्यभर साजरा करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने देशातील बंजारा समाजाची पवित्र काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या वाशिम जिल्ह्यातील तिर्थक्षेत्र पोहरादेवी येथील भक्तीधाम या धार्मिक संस्थानात रविवार दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत भटके विमुक्त दिवस अत्यंत थाटामाटात साजरा करण्यात येणार आहे.भटके विमुक्त समाजासाठी सदरील दिवस केवळ उत्सव नसून नव्या इतिहासाची नांदी आहे.बंजारा व समस्त भटके विमुक्त समाजाचा सर्वांगीण विकासाचा संकल्प पोहरादेवीच्या पवित्र भूमीतून मांडला जाणार आहे. बंजारा समाजाची देशपातळीवरील सर्वात मोठी संघटना म्हणून नावाजलेल्या असलेल्या राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या वतीने सदरील भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाला बंजारा समाजाचे धर्मगुरू तथा आमदार बाबुसिंगजी महाराज,मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर भाऊ नाईक,बंजारा तिर्थक्षेत्र बारा धामचे निर्माते,भगवंत सेवक किसनभाऊ राठोड तसेच भारतीय जनता पार्टी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वरिष्ठ नेते मंडळी यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. भटके विमुक्त हा दिवस राज्य व जिल्हा स्तरावर साजरा करण्यात यावा,सदर दिवशी भटक्या विमुक्त समाजाच्या संस्कृतीचे जीवनमूल्ये,परंपरा दर्शविणारे विविध सामाजिक, सांस्कृतिक,शैक्षणिक व माहीतीपूर्ण उपक्रम राबविण्यात यावे असे आवाहन महायुती सरकारच्या वतीने करण्यात आले आहे. शासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन भटके विमुक्त समाजाच्या वर्तमान काळातील सामाजिक शैक्षणिक आर्थिक सांस्कृतिक धार्मिक व राजकीय प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे.बंजारा,लबाणा सह इतर भटक्या विमुक्त जातींना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना करावी,भटक्या विमुक्तांच्या जीवनात अमुलाग्र बदल व्हावा यासाठी पोहरादेवी येथील कार्यक्रमात अनेक ठराव पारित करून महायुती सरकारकडे रामेश्वरभाऊ नाईक व किसनभाऊ राठोड यांच्या नेतृत्वाखाली सादर केले जाणार आहेत. सदरील कार्यक्रमासाठी महंत जितेंद्र महाराज,कबीरदास महाराज,सुनील महाराज, शेखर महाराज, साहेबराव शास्त्री महाराज,यशवंत महाराज,राष्ट्रीय बंजारा परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष विलासभाऊ राठोड,राष्ट्रीय बंजारा राजकीय परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य प्रा.पी.टी.चव्हाण,राष्ट्रीय महासचिव तथा भाजपचे नेते अँड.पंडित भाऊ राठोड, प्रदेशाध्यक्ष भिकणभाऊ जाधव,राष्ट्रीय प्रवक्ते मधूकरभाऊ जाठोत,डॉ. जगदिशभाऊ सकवाण,प्रदेश प्रवक्ते अमोलभाऊ पवार, ओएसडी निलेश भाऊ जाधव, युवा नेते युवराज राठोड,प्रदेश उपाध्यक्ष प्रेमकिसन राठोड यांची देखील उपस्थिती राहणार आहे. तरी सदरील चर्चासत्रात बंजारा समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन कृष्णा चव्हाण, राजेश पवार,उमेश राठोड,पवन जाधव,राजु राठोड, एकनाथ आडे,विकास जाधव,शामभाऊ राठोड, सत्यम पवार यांनी केले आहे.



धर्मगुरु महंत बाबुसिंग महाराज

## महाराष्ट्र सांस्कृतिक गणेश मंडळाचा उपक्रम, १९ जणांचे रक्तदान



अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील देशपांडे गल्लीत असलेले महाराष्ट्र सांस्कृतिक गणेश मंडळ हे स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेले असून मागील कित्येक वर्षांपासून मंडळ सामाजिक उपक्रम राबवत आहे.शनिवारी या मंडळातर्फे घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात १९ जणांनी रक्तदान केले व हे रक्त शासकीय रुग्णालयाच्या रक्तदान महालॅबला दिले.

रक्तदान शिबिरात शैलेष गोस्वामी,सागर दिक्षित,मनोज जोशी, अवधूत देशपांडे, डॉ.प्रज्वल देशपांडे, अमिर नवाब,अक्षय देशपांडे,स्वप्नील पत्की,सुमित केजकर, अजिंक्य सावरगांवकर,अमोल कुलकर्णी,अनंत औटी, मंदार अराध्ये,आर्य झक्कर,अनिरुद्ध सावरगांवकर,स्वप्नील स्वामी,समर्थ पोकळे, पुराणिक, यांनी रक्तदान केले. हे रक्त स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालयाच्या रक्त पेढीत संकलित केले आहे.

cmyk

# आंध्र सरकार कांदा उत्पादकांना देणार संरक्षण

## १,२०० रुपयाने करणार कांद्याची खरेदी



हैद्राबाद / वृत्तसंस्था

आंध्र प्रदेशात आगाप खरीप कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होऊन बाजारामध्ये आवक वाढली आहे. परिणामी, सध्या मिळणारा दर प्रति क्विंटल १,००० रुपयांच्या आत आहे. उत्पादन खर्च निघत नसल्याने कांदा उत्पादक तणावात आहेत त्यांना दिलासा देण्यासाठी प्रति क्विंटल १,२०० रुपये आधारभूत किंमत देऊन बाजार हस्तक्षेप योजनेअंतर्गत कांदा खरेदीची तयारी सरकारने केली आहे. याबाबत बैठक झाली असली तरी अद्याप अधिसूचना प्रसिद्ध झालेली नाही.

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री नारा चंद्राबाबू नायडू यांनी कांदा उत्पादकांना दिलासा देण्यासाठी सचिवालयात बैठक घेतली. या वेळी कृषी आणि पणन विभागाचे मुख्य सचिव बी. राजशेखर यांसह विभागाचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत अधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांना कांदा आवकेसंबंधी माहिती दिली.पुढील सप्ताहापर्यंत कांद्याची काढणी होऊन ५,००० टन कांदा बाजारात येण्याचा अंदाज वर्तविला. या चर्चेदरम्यान कांदा उत्पादक घटकांना दिलासा देण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी करण्याचे आदेश दिले आहेत. यासाठी बाजार 'हस्तक्षेप निधी' वापरून खरेदी होणार आहे. हा खरेदी केलेला कांदा 'रयतू बाजार'च्या माध्यमातून ग्राहकांपर्यंत पुरवठा केला जाणार असल्याचे तेथील फलोत्पादन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी 'रयतू' बाजारांची संख्या वाढवण्याचे व त्या ठिकाणी पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यामुळे शेतकऱ्यांना थेट ग्राहकापर्यंत कांदा पोहोचण्यासाठी योजना फायद्याची ठरेल असे बोलले जात आहे. कांदा उत्पादक व ग्राहक या दोघांनाही या परिस्थितीत लाभ व्हावा त्यासाठी आगामी काळात कांदा साठवणूक व्यवस्था व शीतसाखळी उभारण्याची गरज असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## जनावरांमधील घटसर्प आजाराची लक्षणे आणि उपाय



वातावरणातील बदलाचा परिणाम जनावरांच्या आरोग्यावर पाहायला मिळतो. पावसाळ्यात घटसर्प ह्या रोगाचा प्रादुर्भाव हा जनावरांमध्ये आढळून येतो. त्यालाच हेमोरॅजिक सेप्टिसिमिया असेही म्हणतात. यावर वेळीच उपाय झाला नाही तर जनावरे दगावण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे वेळीच लसीकणरण करुन घेणे गरजेचे आहे.या रोगाची लक्षणे विशेषत: गाई आणि म्हशीमध्ये आढळतात. हा संसर्गजन्य आजार असल्याने लवकर पसरतो.

रोगाचा प्रादुर्भाव कशा प्रकारे होतो : पाणी साचलेल्या,जनावरांचा गोठा अस्वच्छ असलेल्या किंवा अतिकाम करून थकलेल्या प्राण्यांना या आजाराचा संसर्ग होतो. आजारी जनावरांचा चारा, धान्य आणि पाणी यांचे इतर जनावरांनी सेवन केल्यास किंवा संपर्कात आली तर हा आजार होतोच. तसेच गाईच्या दुधानेही घटसर्प रोगाचा प्रसार होतो.

घटसर्प रोगाची लक्षणे : जनावरांना तीव्र ताप येतो, जवळपास १०५ ते १०६ डिग्री फॅ. ताप जावु शकतो जनावरांचे डोळे लाल आणि सुजलेले दिसायला लागतात.

- नाक,डोळे आणि तोंडातूनस्त्राव होतो. मान,डोके आणि पायांना सूज येते. श्वास घेण्यास त्रास झाल्याने गुदमरून प्राण्याचा मृत्यू होवु शकतो .

संसर्ग झालेल्या प्राण्यांची काळजी कशी घ्याल : या आजारामध्ये जनावरांना अधिक प्रमाणात ताप येतो. श्वास घेण्यास त्रास होवून घशा भोवती सूज येवून जनावरे मृत्युमुखी देखील पडतात. जनावरांच्या शरीरामध्ये घटसर्पाचे जंतू असतात, परंतू वातावरणात झालेला बदलांमुळे व उन्हाळ्यात पौष्टिक चारा न मिळाल्याने शरीरावर ताण येऊन जनावरांची प्रतिकारशक्ती कमी होवु लागते.या आजारावर त्वरित उपचार करणे आवश्यक आहे.घटसर्पची लक्षणे आढळून आल्यास पशूवैद्यकीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधून योग्य तो सल्ला घ्यावा. दरवर्षी मान्सूनपूर्व या आजाराची लस पशुवैद्यक संस्थेकडून घेणे आवश्यक आहे.त्याचबरोबर हे लसीकरण पावसळ्यापूर्वी करणे गरजेचे आहे. जनावरांना घटसर्प आजाराची लक्षणे दिसताच संसर्ग झालेल्या प्राण्याला इतर निरोगी प्राण्यांपासून जनावर वेगळे करावे.तसेच संसर्ग झालेल्या प्राण्याला नदी, तलाव, तलाव इत्यादी ठिकाणी पाणी पिऊ देऊ नये.

## गहू लागवडीसाठी सुधारीत वाणांची निवड

गहू हे राज्यात रब्बी हंगामात घेतले जाणारे महत्त्वाचे अन्नधान्य पीक आहे. गहू हे पीक जिरायत व बागायती अशा दोन्ही प्रकारे घेतले जाते. देशाच्या सरासरी उत्पादनाचा विचार करता गव्हाचे सरासरी उत्पादन कमी आहे. सुधारीत वाणांचा वापर न करणे, अपूरे पाणी व्यवस्थापन, कोरडवाहू गव्हाची लागवड अशी उत्पादन कमी येण्याची कारणे आहेत. गव्हाच्या उत्पादनवाढीसाठी सुधारीत वाणांचा वाणांचा वापर करणे महत्त्वाचे आहे.

गहू लागवडीसाठी जमीन :पाण्याचा चांगला निचरा होणारी, भारी व खोल जमिनीची निवड बागायती गहू लागवडीसाठी करावी. तसेच भरखते व रासायनिक खताचा योग्य वापर केल्यास मध्यम जमिनीतही चांगले उत्पादन मिळते. जिरायती गव्हाची लागवड जमिनीत ओलावा टिकवून धरणाऱ्या भारी जमिनीत करावी.पेरणीची वेळ :जिरायती गव्हाची लागवड करायची असल्यास त्याची पेरणी ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात करावी. बागायती गव्हाची पेरणी वेळेवर म्हणजेच नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात करावी. बागायती गव्हाची पेरणी १५ नोव्हेंबर नंतर केल्यास प्रत्येक आठवड्यात हेक्टरी २.५ क्विंटल उत्पादनात घट येते.

जमिनीची मशागत :गहू पिकाच्या मुळ्या जमिनीत खोलवर जातात. त्यामुळे गहू लागवडीपूर्वी जमीन भुसभुशीत असणे आवश्यक आहे. खरीप पीक काढणीनंतर १५ ते २० सें.मी. खोलीवर जमिनीची नांगरट करावी. त्यानंतर कुळवाच्या पाळ्या द्याव्यात. त्यामुळे जमीन भुसभुशीत होते. शेवटच्या कुळवणीपूर्वी १० ते १२ टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत जमिनीत पसरावे.

गव्हाचे सुधारीत वाण :बरेसचे शेतकरी भात पिकानंतर गहू पिकाची लागवड करतात. भात पीक काढणीनंतर गहू लागवड करायची असल्यास तसेच दोन ते तीन पाण्याच्या पाळयांची सुविधा असल्यास उशिरा पेरणीसाठी निफाड-३४ या वाणाची निवड करावी. या वाणाची शिफारस उशिरा बागायती पेरणीसाठी करण्यात आली आहे.

एन आय ए डब्ल्यू- ३०१ (त्र्यंबक), एन आय ए डब्ल्यू- ९१७ (तपोवन), एम ए सी एस- ६२२२ हे सरबत्ती वाण व एन आय डी डब्ल्यू-२९५ (गोदावरी) हा बक्षी वाण बागायती वेळेवर पेरणीसाठी योग्य आहे.बागायती उशिरा पेरणीसाठी एन आय ए डब्ल्यू- ३४ आणि ए के ए डब्ल्यू-४६२७ या वाणाची तर जिरायती पेरणीसाठी एन आय डी डब्ल्यू- १५ (पंचवटी) ए के डी डब्ल्यू- २९९७-१६ (शरद) हे वाण उपयुक्त आहेत. पाण्याची उपलब्धता कमी असल्यास एन आय ए डब्ल्यू-१४१५ (नेत्रावती) व एच डी २९८७ (पुसा बहार) या सरबती वाणांची लागवड करावी.



# परतीच्या पावसामुळे शंखी गोगलगायीचा धोका

परतीचा पाऊस पडल्यानंतर सुप्तावस्थेतील शंखी गोगलगायी बाहेर पडताना आढळून येतात, त्यामुळे फळबाग, कापूस यासारख्या पिकामध्ये गोगलगायींचा प्रादुर्भाव वाढून मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी या गोगलगायींचे वेळीच सामुहिकरीत्या एकात्मिक नियंत्रण करावे,शंखी गोगलगायीसाठी नियंत्रणात्मक उपाय योजना : सायंकाळी किंवा सूर्योदयापूर्वी शेतातील गोगलगायी गोळा करून साबणाच्या अथवा मिठाच्या पाण्यात बुडवून माराव्या किंवा शेतातून मोठ्या शंखी गोगलगायी जमा करून प्लास्टिकच्या पोत्यात भरून त्यात कोरडे मीठ अथवा चुना टाकून त्या पोत्याचे तोंड उघडे न ठेवता घट्ट बंद करावे, जेणेकरून त्यामधील गोगलगायी पोत्यातून बाहेर न जाता मिठाच्या किंवा चुन्याच्या संपर्कात येऊन आत मध्येच मरून जातील. गोगलगायी जमा करताना अथवा हाताळणी करताना उघड्या हाताने न करता हातमोजे व तोंडावर मास्क घालूनच करणे गरजेचे आहे. शेतामध्ये किंवा बागेमध्ये ७ ते ८ मीटर अंतरावर विविध ठिकाणी वाळलेल्या गवताचे किंवा भाजीपाला पिकांच्या अवशेषाचे ढीग अथवा गोणपाट गुळाच्या पाण्यात ओले करून शेतात ठिकठिकाणी ठेवावेत. गोगलगायी त्या ठिकाणी आश्रयाला जातात. सूर्योदयानंतर त्याखाली गोळा झालेल्या गोगलगायी व त्यांची अंडी गोळा करून मिठाच्या पाण्यात टाकून नष्ट करावी. गोगलगायींना आकर्षित करण्यासाठी शेतात ठिकठिकाणी गोणपाट ओले करून त्यावर पत्ताकोबी अथवा पपईची पाने बारीक करून ठेवावीत, त्याला आकर्षित होऊन जमा झालेल्या गोगलगायींवर तंबाखूचा अर्क ५



लिटर (२५० ग्रॅम तंबाखू भुकटी ७.५ लिटर पाण्यात उकळून ५ लिटर तयार झालेले द्रावण) + कॉपर सल्फेट म्हणजेच मोरचूद द्रावण ५ लिटर (३०० ग्रॅम कॉपर सल्फेट ५ लिटर पाण्यात) असे एकूण १० लिटर द्रावण फवारावे, त्याच्या संपर्कात आल्याने गोगलगायी मरतात. लहान शंखीच्या नियंत्रणासाठी १० टक्के मिठाची (१०० ग्रॅम प्रति १ लिटर पाणी) फवारणी फायदेशीर दिसून आली आहे. बोर्डो मिश्रण (१ किलो मोरचूद + १ किलो चुना १०० लिटर पाण्यात), कॉपर सल्फेट (३०० ग्रॅम १० लिटर पाण्यात) किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड (२५ ग्रॅम १० लिटर पाण्यात) इत्यादीच्या फवारण्या गोगलगाय नियंत्रणासाठी नोंदणीकृत नाहीत, परंतु गोगलगाय नियंत्रणासाठी किंवा त्यांना परावृत्त करण्यासाठी फळबागेत काही प्रमाणात परिणामकारक आहेत.

गोगलगायीच्या नियंत्रणासाठी मेटाल्डिहाईड दाणेदार या गोगलगाय नाशकाचा वापर करावा. कापसासारख्या पिकामध्ये दाणेदार मेटाल्डिहाईड २ किलो प्रति एकर या प्रमाणात शेतात पसरून द्यावे. फळबागेमध्ये झाडाखाली दाणेदार मेटाल्डिहाईड प्रति झाड १०० ग्रॅम पसरून टाकावे. शंखी गोगलगाय प्रामुख्याने पपईची रोपे व झेंडूच्या रोपांकडे आकर्षित होतात. म्हणून मेटाल्डिहाईडच्या गोळ्या पपईच्या पिवळ्या पानांजवळ ठेवतात. त्यामुळे त्या लवकर आकर्षित होऊन मोठ्या प्रमाणात मरतात. मेटाल्डिहाईडचा वापर जास्त तापमान व कमी आर्द्रता असते अशावेळी जास्त प्रभावी दिसून येतो.

मेटाल्डिहाईडला पर्याय म्हणून आयर्न फॉस्फेटचा वापर २ किलो प्रति एकर या प्रमाणात अमिष म्हणून करता येतो. आयर्न फॉस्फेटचा वापर आर्द्रता जास्त असते अशावेळीही प्रभावी दिसून येतो. आयर्न फॉस्फेटच्या संपर्कात आल्यास गोगलगायी उपाशी राहून मरतात. आयर्न फॉस्फेटचा वापर स्पिनोसॅड या कीटकनाशकासोबत (४ मिलि स्पिनोसॅड प्रति २ किलो आयर्न फॉस्फेट) केल्यास जास्त परिणामकारक होतो. आयर्न फॉस्फेट पाळीव प्राणी व इतर प्राण्यांना सुरक्षित आहे. वर सांगितल्याप्रमाणे आमिष उपलब्ध न झाल्यास, पुढील प्रकारे आमिष तयार करून बागेमध्ये टाकून घ्यावे. या व्यतिरिक्त अंड्यांच्या टरफलाचा चुरा, कोरडी राख,तांब्याची पट्टी अथवा जाळी, बोरिक पावडर, यीस्ट पावडरचे द्रावण, साखरेचे द्रावण इ. चा वापर गोगलगायी व्यवस्थापनासाठी करता येतो.

आमिष तयार करण्याची पद्धती : दहा लिटर पाण्यामध्ये दोन किलो गूळ अधिक २५ ग्रॅम यीस्ट यांचे द्रावण तयार करावे. हे द्रावण ५० किलो गव्हाच्या अथवा भाताच्या कोंड्यात टाकून चांगले मिसळावे. १० ते १२ तास हे मिश्रण आंबविण्यासाठी ठेवावे. त्यानंतर त्यामध्ये थायामिथोक्झाम २५ टक्के ५० ग्रॅम चांगल्या प्रकारे मिसळावे.

हे आमिष शेतामध्ये ढीगाच्या स्वरुपात किंवा बांधाच्या कडेने पट्टा स्वरुपात टाकावे. सदरील आमिष पासून पाळीव प्राणी, लहान मुलांना दूर ठेवावे. वरील गोगलगाय नाशक अथवा अमिषाचा वापर प्लॅस्टिक हातमोजे घालूनच काळजीपूर्वक करावा.अशाप्रकारे शंखी गोगलगायीचा प्रादुर्भाव ज्या भागात मोठ्या प्रमाणात दिसून येत असेल त्या भागातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सामूहिकरित्या वरील प्रमाणे उपाय योजना सुरवातीपासूनच केल्यास गोगलगायीचे नियंत्रण अधिक प्रभावीपणे होते.




### महत्वाच्या घटना

१९०६ : इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ इंटलेक्क्चुअल प्रोपर्टी अॅटॉर्नीची स्थापना झाली.
१९११ : पं. भास्करबुवा बखले यांनी पुण्यात भारत गायन समाजाची स्थापना केली.
१९१४ : रशियातील सेंट पीट्सबर्ग शहराचे नाव बदलुन पेट्रोग्राड करण्यात आले.
१९२३ : टोक्यो आणि योकोहामा परिसरात भूकंप १,०५,००० ठार.
१९३९ : जर्मनीने पोलंडवर आक्रमण केले. या घटनेमुळे दुसर्या महायुद्धाची सुरुवात झाली.
१९५१ : अर्नेस्ट हेमिंग्वे यांची 'द ओल्ड मॅन अॅन्ड द सी' ही कादंबरी प्रकाशित झाली. या कादंबरीबद्दल त्यांना नोबेल पारितोषिक व पुलित्झर पुरस्कार मिळाले.
१९५६ : भारतीय आयुर्विमा महामंडळाची स्थापना झाली.
१९६१ : ची स्थापना (१ सप्टेंबर १९६१) (राष्ट्रीय शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण परिषद )
१९६९ : लिबीयात उठाव होऊन हुकूमशहा मुअम्मर गडाफी सतेवर आला.
१९७२ : आइसलँडमधील रिकजेविक येथे अमेरिकेच्या बॉबी फिशरने रशियाच्या बोरिस स्पास्कीला बुद्धीबळात पराभूत केले व जगज्जेता बनला.
१९७९ : पायोनियर- ११ अंतराळयान शनीपासून २१,००० किमी अंतरावरुन गेले.
१९८५ : संयुक्त अमेरिकन-फ्रेंच मोहिमेमुळे बुडालेले आरएमएस टायटॅनिक सापडले.
१९९१ : उझबेकिस्तानने आपण (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र असल्याचे घोषित केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९५ : न्यूयॉर्क हेरॉल्ड चे संस्थापक जेम्स गॉर्डन बेनेट सीनियर यांचा जन्म. (मृत्यू: १ जुन १८७२)
१८१८ : कोस्टा रिका देशाचे पहिले राष्ट्रपती जोस मारिया कॅस्ट्रो माद्रीझ यांचा जन्म. (मृत्यू: ४ एप्रिल १८९२)
१८९५ : मानव-सक्षम विमानांचे निर्मिते एंगलबर्ट जशचा यांचा जन्म. (मृत्यू: २६ जून १९५५)
१८९६ : अभय चरणारविंद भक्तिवेदांत तथा स्वामी प्रभूपाद हरेकृष्ण पंथाचे संस्थापक (मृत्यू: १४ नोव्हेंबर १९७७)
१९०८ : कृष्ण नारायण तथा के. एन. सिंग हिन्दी चित्रपटांतील गाजलेले खलनायक (मृत्यू: ३१ जानेवारी २०००)
१९१५ : राजिंदरसिंग बेदी ऊर्दू कथाकार आणि हिन्दी पटकथालेखक. साहित्य अकादमी पुरस्कार (१९६५), पद्मश्री (१९७२). 'दस्तक' या चित्रपटाची कथा, पटकथा, लेखन व दिग्दर्शन त्यांचे असून या चित्रपटाला तीन राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. (मृत्यू: ? ? १९८४)
१९२१ : माधव मंत्री यष्टीरक्षक व उजव्या हाताचे फलंदाज
१९३० : भारतीय आर्किटेक्ट चार्ल्स कोरिया यांचा जन्म. (मृत्यू: १६ जून २०१५)
१९३१ : भारतीय शास्त्रज्ञ आणि विद्वान अब्दुल हक अन्सारी यांचा जन्म. (मृत्यू: ३ ऑक्टोबर २०१२)
१९४६ : दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष रोह मू-ह्युन यांचा जन्म.
१९४७ : साली भारतीय राजकारणी व लोकसभेचे माजी अध्यक्ष तसचं, मेघालय राज्याचे माजी मुख्यमंत्री पी. एम. संगमा यांचा जन्मदिन.
१९७० : भारतीय-अमेरिकन अभिनेत्री आणि लेखक पद्मा लक्ष्मी यांचा जन्म.
१९७६ : जेष्ठ साहित्यिक वि.स.खांडेकर स्मृतिदिन

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५७४ : गुरू अमर दास शिखांचे तिसरे गुरू (जन्म: ५ मे १४७९)
१५८१ : गुरू राम दास शिखांचे चौथे गुरू (जन्म: २४ सप्टेंबर १५३४)
१७१५ : सलग ७२ वर्षे राज्यकारभार केल्यानंतर फ्रान्सचा राजा १४ वा लुई मरण पावला. त्याचा राज्यकाल कोणत्याही युरोपीय राज्यकर्त्यापेक्षा जास्त होता. (जन्म: ५ सप्टेंबर १६३८)
१८९३ : काशिनाथ त्र्यंबक तेलंग प्राच्यविद्या संशोधक, न्यायमूर्ती, कायदेपंडीत, समाजसुधारक, अखिल भारतीय काँग्रेसचे एक संस्थापक, काँग्रेसचे चिटणीस (१८८५-१८८९), मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू (१८९२), हिंदू कायद्यात सुधारणा होण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. भगवद्गीतेचा त्यांनी इंग्रजीत अनुवाद केला. (जन्म: ३० ऑगस्ट १८५०)
२००८ : थॉमस जे. बाटा बाटा शू कंपनीचे संस्थापक (जन्म: १७ सप्टेंबर १९१४)
२०१४ : स्पॅनडेक्स चे निर्माते योसेफ शेव्हर्स यांचे निधन. (जन्म: २९ नोव्हेंबर १९३०)
२०२० : जेर्झी स्काझाकिएल पोलिश स्पीडवे रायडर, विश्वविजेते (जन्म: २८ जानेवारी १९४९)
२०२० : शेखर गवळी भारतीय क्रिकेटपटू,(महाराष्ट्र) (जन्म: ६ ऑगस्ट १९७५)

# झन्ना-मन्ना जुगार खेळ खेळणाऱ्या अड्ड्यावर पोलिसांचा छापा

छ संभाजीनगर। प्रतिनिधी

पोलीस ठाणे फुलंब्री हद्दीतील सावंगी येथील पुनम हॉटेल जवळच्या पत्राच्या शेड मध्ये पत्यावर पैसे लावुन झन्ना-मन्ना नावाचा जुगार खेळ खेळला व खेळविला जात असलेची प्राप्त गोपनिय माहीती अपर पोलीस अधीक्षक, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण अन्नपूर्णा सिंह यांना मिळाली त्याआधारे अन्नपूर्णा सिंह, अपर पोलीस अधीक्षक, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण यांनी वाचक सपोनि सिध्देश्वर गोरे यांना बोलावुन सदर ठिकाणी जुगार रेड करणेबाबतचे अधिकारी पत्र दिलेने सपोनि गोरे यांनी त्यांचेअधिपत्याखालील वाचक शाखेतील पो कॉ किशोर राजपुत, रामसिंग सुलाने, शेरु तडवी, पोना जारवाल, पोकॉ जोनवाल, शासकीय फोटोग्राफर फुलारे यांचे सह खाजगी वाहनाने तसेच पोलीस मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथील एक प्लाटुन तुकडी सोबत घेऊन छापा टाकला असता पुनम हॉटेलच्या शेजारी असलेल्या बदीस्त पत्राच्या खोलीमध्ये काही इसम हे पत्याचा जुगाराचा खेळ खेळताना दिसुन आले.

त्यावेळी त्यातील ५ ते ६ जण आम्हांला पाहुन पळुन गेली तेव्हा रेड पथकांनी तेथे जुगार खेळत असलेल्या १) अक्षय अशोक मगरे वय २७ वर्ष



रा.चिकलठाणा छ.सं. २) सोमनाथ साईबाबा श्रीरंग वय ३० वर्ष रा. कोठवालपुरा छ.सं. ३) संदिप प्रकाश हिवराळे वय ३९ वर्ष रा.जुबली पार्क छ.सं. ४) डिंगबर रामराव गाडेकर वय ३६ वर्ष रा. मोहरा ता. कन्नड ५) महीद्रा चंद्रशेखर जैन वय ५७ वर्ष रा.शहागंज छ.सं. ६) संदिप कैसरीनाथ बोराडे वय ३९ वर्ष रा.चिकलठाणा छ.सं. ७) चंदन शांतालाल पहाडीये वय ४९ वर्ष रा. चेलीपुरा छ.सं. ८) शिवाजी रामभाऊ चाळगे वय ४८ वर्ष रा. वानखेडे नगर छ.सं. ९) शेख भिकन शेख शकील वय ४३ वर्ष रा. रहेमानिया कॉलणी छ.सं. १०) राजु प्रकाश बटावाले वय २५ वर्ष रा. शहागंज छ.सं. ११) अभिमन्यु सांडुलाल पहाडीया वय ३७ वर्ष रा.शहागंज छ.सं. १२) योगेश रामकिसन पिठोरे वय ३२ वर्ष रा. चेलीपुरा छ.सं. १३) नविन शामलाल बंगारकर वय ३० वर्ष रा. आलमगिर कॉलणी छ.सं. १४) सय्यद नविद अली वय ५१ वर्ष रा. रोशन गेट छ.सं. १५) विजय भगवान सुपेकर वय ३८ वर्ष रा.चेलीपुरा छ.सं. १६) शेख गुलाब शेख हमीद वय ५० वर्ष रा. खोकडपुरा छ.सं. १७) शेख राज मोहम्मंद वय ४४ वर्ष रा.चित्तेगावं ता.जि.छ.सं. १८) समिर रहीम शेख वय ३३ वर्ष रा. रहेमानिया कॉलणी छ.सं. १९) सदानंद वालय्या चप्पला वय ६० वर्ष रा. नवापुरा छ.सं. २०) सलीम गुलाम खान वय ४५ वर्ष रा. मिटमिटा २१) गुलशेर पुरन खान वय २७ वर्ष रा. सावंगी २२) रियाज मुसा शेख वय ३६ वर्ष रा. रेणुका मातामंदीर बीड बाय पास छ.सं. २३) राजेश विरकिसन दत्तात्रय वय ५४ वर्ष रा. बेगमपुरा छ.सं. २४) विशाल कृष्णा जाधव वय ३६ वर्ष रा.मयुर पार्क छ.सं. या एकुण २४ जणांना पकडुन त्यांचे अंगझडतीमध्ये नगदी १,६३,२०० रुपये व जुगार खेळण्याचे साहीत्य १५,००० रुपये, मोबाईल हँडसेट किंमती २,२०,००० रुपयाचे तसेच ८,४०,००० रुपये किंमतीचे वाहने असा एकुण १२,३८, २०० रुपयाचा ऐवज जुगार रेड मध्ये मिळुन आल्याने तो १९.०० वाजता ते २१.३० वाजेपावेतो पंचासमक्ष पंचनामा करुन जप्त करण्यात आलेला आहे. नमुद जुगार रेड प्रकरणातील नमुद जुगारी आरोपी विरुध्द सहायक पोलीस निरीक्षक सिध्देश्वर रामकिसन गोरे, वाचक अपर पोलीस अधीक्षक, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण यांचे फिर्याद वरुन पोलीस ठाणे फुलब्री येथे गुरंनं. ४३३/२०२५ कलम ४,५ महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल केलेला आहे.

सदरची जुगार रेडची कार्यवाही पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अप्पर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेली आहे.

## गोळीबार प्रकरणातील मुख्य आरोपीसह तिघे अटकेत

### श्रीरामपूर शहर सुरक्षा यंत्रणेला थेट आव्हान



श्रीरामपूर। प्रतिनिधी

शहराच्या मध्यवस्तीत शुक्रवारी दुपारी झालेल्या गोळीबाराने अक्षरशः थरकाप उडवला आहे. शिवाजी रस्त्यावरील गिरमे चौकात हुजेफा अनिस शेख याने पिस्तुलातून दोन गोळ्या झाडल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सुदैवाने अनर्थ टळला असला, तरी या घटनेने शहरातील सुरक्षेचा बोजवारा उडाल्याचे स्पष्ट झाले आहे.

या प्रकरणी मुख्य आरोपी हुजेफा शेख याच्यासह गोरख जेधे आणि ऋषिकेश कांबळे या दोघांनाही पोलिसांनी अटक केली आहे. या युवकांचा गोळीबाराशी संबंध असल्याचे समोर आले असून, त्यांची कसून चौकशी सुरू आहे. अन्य आरोपींच्या शोधासाठी तीन विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. गोळीबारानंतर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन गर्दीने गिरमे चौक गजबजून गेला होता. नागरिक भीती व्यक्त करत होते. यात युवकांची संख्या लक्षणीय होती. दिवसाढवळ्या शहराच्या हृदयस्थानी झालेल्या या घटनेमुळे कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. घटनास्थळी दाखल झालेले आमदार हेमंत ओगले यांनी पोलिसांना फैलावर घेत हे गँगवॉर आत्ताच्या आत्ता थांबले पाहिजे. या टोळ्या शहरातून हद्दपार करा. यापुढे अशा घटना मी खपवून घेणार नाही, असा इशारा दिला, तसेच वाढत्या गुन्हेगारीवर तातडीने अंकुश लावण्याची मागणी त्यांनी केली.

### मध्यप्रदेश कनेक्शन असण्याची शक्यता


शहरात अलीकडच्या काळात मध्यप्रदेश मार्गे मोठ्या प्रमाणावर गावठी कट्टे आणि पिस्तुले येतात, अशी धक्कादायक माहिती समोर येत आहे. या अवैध शस्त्रसाखळीमुळे तरुणाईत गुन्हेगारी प्रवृत्तीला खतपाणी मिळत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. गिरमे चौकातील गोळीबार हा केवळ एक गुन्हा नसून शहरातील सुरक्षेला व नागरिकांच्या विश्वासाला दिलेले थेट आव्हान आहे. पोलिसांनी केवळ आरोपींना पकडणे पुरेसे ठरणार नाही; तर शहरात शिरणाऱ्या अवैध शस्त्रांचा पुरवठा बंद करणे हा खरा कस लागणारा मुद्दा ठरणार आहे.

## खैरी मध्यम प्रकल्प ‘ओव्हर फ्लो’

जामखेड। प्रतिनिधी

तालुक्यातील सर्वात मोठा खैरी मध्यम प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला असून, ओव्हर फ्लो झाला आहे. ५३३.६० दशलक्ष घनफूट क्षमता असलेला खैरी मध्यम प्रकल्प जामखेड तालुक्यातील सर्वात मोठा प्रकल्प असून, शुक्रवारी दुपारी पूर्ण क्षमतेने भरून खैरी प्रकल्पाच्या सांडव्यावरून नदीपात्रात नऊ क्यूसेक इतका विसर्ग सुरू झाला आहे.

खैरी मध्यम प्रकल्पाचे पाणीसाठ्यात वाढ होऊन, प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे, सांडव्यातून मोठ्या प्रमाणात नदीपात्रातील पाण्याच्या विसर्गात ही वाढ होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनातर्फे प्रकल्पाचे बुडीत क्षेत्राजवळील व प्रकल्पाच्या खालील बाजूस असणारी नदी काठा जवळील गावे, वस्त्या, वाडे, तांड्यावरील शेतकरी व ग्रामस्थांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. बुडीत क्षेत्रातील व पूर रेषेपर्यंतच्या नदीपात्रातील आपले पशुधन, मौल्यवान वस्तू, कृषी पंप, शेती औजारे सुरक्षित जागी हलविण्याबाबत प्रशासनातर्फे सूचना देण्यात



आल्या आहेत. सांडव्यातून नदीपात्रात विसर्ग वाढण्याची शक्यता असल्याने सांडव्यातून व नदीपात्रातून ये-जा करताना दक्षता घेण्यात यावी. खैरी मध्यम प्रकल्पाचे नदीकाठ लगतची जामखेड तालुक्यातील गावे वंजारवाडी, तरडगाव, सोनेगाव व धनेगाव, तसेच प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रा जवळील असणारी सातेफळ, वाकी, लोणी, बाळगव्हाण व खर्डा गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. याबरोबर परांडा तालुक्यातील (जि. धाराशिव) चिंचपूर बुद्रुक, पांढरेवाडी या गावांनाही सतर्कतेचा इशारा दिला आहे.

**भरण्याची चौथी वेळ :** खैरी मध्यम प्रकल्पात पाणीसाठा करण्यास १९९० पासून सुरवात झाली. मागील ३५ वर्षांत यापूर्वी फक्त तीन वेळेस १९९८ मध्ये २४ ऑगस्ट १९९८ रोजी, २०१० मध्ये ६ ऑगस्ट २०१० रोजी व २०२४ मध्ये २४ ऑगस्ट २०२४ रोजी, असे चार वेळा हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला होता. सर्वसाधारण खैरी मध्यम प्रकल्प हा सप्टेंबरमध्ये भरलेला आहे; परंतु यावर्षी सुरवातीपासूनच प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या स्वरूपात पाऊस झाल्यामुळे ऑगस्टमध्ये हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला आहे.



**बीड : लोक सांस्कृतित नंदीबैल घेऊन गावोगावी फिरणारे लोक कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळात नंदी बैलाला सजवून शहरातील मित्र नगर भागात लोकांना त्यांचे भविष्य सांगून आपला चरितार्थ चालविताना सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे यांनी टिपलेले छायाचित्र**

## के.एस.पी.विद्यालय येथे मेजर ध्यानचंद जयंती

बीड। प्रतिनिधी

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथाक्रिडा परिषद बीड यांच्या संयुक्त विदयमानाने के.एस.पी. विद्यालय, बीड येथे क्रीडा परिसंवादाचे आयोजन, तंदुरुस्ती विषयक चर्चासत्र, मैदानी व इनडोअर क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिना निमित्त भारतात क्रीडादिन म्हणून दि.२९ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो. खेळ ही एक शारीरिक व मानसिक कला आहे. खेळल्यामुळे शारीरिक विकास साधतो तसेच मानसिकताही प्रबळ बनते. दररोज किमान अर्धा ते एक तास कोणतातरी खेळ खेळला पाहिजे. खेळामुळे चपळता वाढते त्याचप्रमाणे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकासही घडतो. खेळाचे वेगवेगळे प्रकार आहेत. वेगवेगळे खेळ वेगवेगळ्या पद्धतींनी खेळले जातात. खेळांमध्ये बैठे खेळ व मैदानी खेळ असे दोन प्रकार आहेत. आज जगभरात विविध स्तरांवर विविध खेळ खेळले जातात. खेळ हा माणसासाठी महत्त्वाचा असून त्यामुळे मानसिक



स्वास्थ्य लाभते. करिता शाळेमध्ये विविध इनडोअर क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना खुप मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास श्री. जे.पी. शेळके, (शिव छत्रपती पुरस्कार विजेते, खो-खो चे राज्य अध्यक्ष तथा नारायण गडाचे विश्वस्त) श्री. अरविंद विद्यागर, (जिल्हा क्रीडा अधिकारी) श्री. अनिकेत काळे, (क्रीडा अधिकारी ) श्री. कालिदास होसुरकर (क्रीडा अधिकारी ) , सौ.अंजलीताई शेळके, श्री. ऋषिकेशजी शेळके, (जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख), शाळेचे प्रा. मुख्याध्यापक विशाल सुपेकर, तसेच शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम संपन्न झाला.

## भर पावसात तब्बल १२ तास भालचंद्र गणपतीचा छबिना ; पोलिस प्रशासनाचा पालखीला खांदा

लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागनेश येथील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपतीच्या वार्षिक उत्सवाची सांगता ऋषिपंचमीला झाली. गुरुवारी रात्री नऊ वाजता मंदिरात सामुदायिक आरतीनंतर उत्सव मूर्ती पालखीत विराजमान करून छबीना मिरवणुकीला सुरुवात झाली.गावात सुरू झालेली ही मिरवणूक भर पावसात तब्बल १२ तास अविरत सुरू राहिली. पालखी मंदिर प्रदक्षिणेनंतर बाजार तळ मार्गे मारुती मंदिराजवळ पोहोचली, तेव्हा भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली. येथे सलग दोन तास लेझीमचा जोशपूर्ण डाव रंगला. गावातील ठिकठिकाणी रांगोळ्या काढून पालखीचे स्वागत करण्यात आले.

महिला भक्तांनी औक्षण करून मोदक



व नारळ अर्पण केले. पालखीचे खांदेकरांचे पाय धुऊन प्रसाद देत त्यांचा सन्मान करण्यात आला. परीट समाजातील महिलांनी मिरवणुकीसमोर पायघड्या घालून सेवाभाव जपला.छबीना मिरवणुकीत लेझीम, ढोल-ताशा, हलगी, टाळ, मृदंगाच्या गजरात ‘‘मोरया मोरया, जय गजानन मोरया‘‘ असा जयघोष दुमदुमत होता.

श्रीहरी कोठुळे, बाळू मोरे, बाळू घोलप, रंजीत भोसले, अभिजीत गायकवाड, ओंकार तागड, सुरज भोसले, सचिन भोसले, अशोक जाधव यांच्यासह भजनी मंडळीने उत्साहात सहभाग घेतला. दरम्यान, छबीना मिरवणुकीदरम्यान तैनात पोलिस प्रशासनातील अधिकारीही भक्तिभावाने सहभागी झाले. पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी, पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, लिंबागणेश चौकीचे सहाय्यक फौजदार बाबासाहेब राख यांनी पालखीला खांदा देऊन मनोभावे दर्शन घेतले.

## नामस्मरण हे भगवंताच्या प्राप्तीचे सुलभ साधन आहे

### ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट उपक्रमात: माधव महाराज डाके यांचे प्रतिपादन

बीड प्रतिनिधी

ज्ञानियांचे राजे साधकांचे मायबाप कैवल्य चक्रवर्ती सम्राट माऊली श्री. ज्ञानोबाराय यांच्या ७५० व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त एकावन्न श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट उपक्रमांतर्गत आज शनिवार दि.३० ऑगस्ट २०२५ रोजी बीड शहरातील वाडिया वाचनालयाचे ग्रंथपाल गणेश शेंडगे यांच्या घरी मोठ्या उत्साही व आनंदी वातावरणात ज्ञानेश्वरी ग्रंथाचे भव्य दिव्य स्वागत झाले. यावेळी ग्रंथराज ज्ञानेश्वरी ची ज्ञानदेव तुकाराम या गजरात मिरवणूक काढण्यात आली होती. उपक्रमाचे संयोजक ह.भ.प.माधव महाराज डाके यांनी ज्ञानेश्वरी ग्रंथाची विधिवत पूजा करून सदरील ग्रंथ गणेश शेंडगे व त्यांच्या धर्मपत्नी शेंडगे ताई यांच्या हातात सुपूर्द केला. या नंतर डाके महाराजांनी ज्ञानेश्वरीतील नवव्या अध्यायातील नामजपाचे महात्म्य सांगणारी ओवी निवडून तासाभराचे श्री ज्ञानेश्वरी ग्रंथाचे महात्म्य सांगणारे प्रवचन केले.

सदरील या ओवीवर चिंतन मांडताना श्री ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी ग्रंथात नाम साधनेचे महत्व कसे प्रतिपादन केले आहे ते सांगितले.भगवंत प्राप्तीचे विविध मार्ग आहेत.



परंतु यामध्ये सर्वात सुलभ साधना नामस्मरणआहे. हा सिद्धांत विविध दृष्टांत देऊन जमलेल्या श्रोत्यांना आपल्या सोप्या भाषेत पटवून दिले . या प्रवचन सेवेमध्ये ज्ञानेश्वर माऊलींनी लिहिलेला हरिपाठ, चांगदेव पासष्टी ,अमृत अनुभव व ज्ञानेश्वरी ग्रंथ यावर सविस्तर भाष्य केले .साधकांचे मायबाप ज्ञानोबारायांना माऊली का म्हटले जाते याचे उत्तर आपणास हरिपाठ मध्ये मिळते हे विशद केले. शेंडगे परिवाराकडे ज्ञानेश्वरी ग्रंथाचे स्वागत गणेश शेंडगे व त्यांच्या धर्मपत्नी सौ.उषा गणेश शेंडगे यांनी केले. ग्रंथराज ज्ञानेश्वरी आगमना निमित्त दारात सुंदर रांगोळी व फुलांची पख रण केलेली होती. गोरज मुहूर्तावर सांजवेळी श्री. ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रत्यक्ष ज्ञानोबारायाच आपल्या घरी येत आहेत हा भाव शेंडगे दांपत्याच्या चेहऱ्यावर दिसत होता. यावेळी दारामध्ये सर्वत्र दिवे लावून दिपपूजन करण्यात आले.त्यानंतर श्री.ज्ञानेश्वरीचे पूजन केले. व महाराजांचे औक्षण केले .घरोघरी एकावन्न ज्ञानेश्वरी सस्नेह भेट या उपक्रमांतर्गत कालच्या या कार्यक्रमाला आई रामकवर शेंडगे, ज्येष्ठ पत्रकार प्रमोद कुलकर्णी, दैनिक चंपावती चे पत्रकार महादेव( नाना )साळुंके गणेश शेंडगे, गुरुप्रसाद शेंडगे, विणेकरी वाल्मीक मामा चाटे,श्रीराम जाधव, डोरले काका व काकू यांच्यासह शिंदे नगर कॉलनी परिसरातील भाविक भक्त व माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. श्री.ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी दैनिक चंपवतीपत्रचे महादेव (नाना) साळुंके यांनी अथक परिश्रम घेतले.कार्यक्रमाच्या शेवटी पसायदान व गणरायाची आरती करण्यात आली.आणि महाप्रसाद वाटप करण्यात आला. कार्यक्रमाचे सुंदर नियोजन महादेव नाना साळुंके यांनी केल्याबद्दल माधव महाराज डाके शेंडगे परिवारकडून शाल श्रीफळ व पुष्पहार देऊन महादेव नाना साळुंके यांचा सत्कार करण्यात आला

## पशुखाद्य डिलरशीपच्या बहाण्याने फसवणूक

### शेतकऱ्याला पुण्यातील दोघांकडून ३ लाखांचा गंडा




अहिल्यानगर। प्रतिनिधी

दूधकांडी पशुखाद्याची डीलरशीप देण्याच्या बहाण्याने धनगरवाडी (ता. नगर) येथील शेतकऱ्याची पुण्यातील दोघांनी ३ लाखांची फसवणूक केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी शेतकऱ्याच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलिसांनी दोघांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

पोपट शिकारे (वय ४५, रा. धनगरवाडी, ता. नगर) यांची २०२३ मध्ये सोशल मीडियाच्या माध्यमातून विलास कासुर्डे व स्वप्नील मोरे (रा. स्वारगेट, पुणे) यांनी दूधकांडी हे पशुखाद्य तयार केलेले असून त्याची डीलरशीप देत असल्याची माहिती दिली होती. त्यानंतर शिकारे यांनी त्यांच्याशी संपर्क साधून ३ लाख रुपये अनामत रक्कम भरली. त्यानंतर अनेकदा त्यांना डीलरशीपबाबत संपर्क केला असता, दोघांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर त्यांचे फोन घेणेही टाळू लागले. आपली फसवणूक झाल्याचे शिकारे यांची खात्री झाली. अखेर त्यांनी २९ ऑगस्ट रोजी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

# पाटोदा तालुक्यात जि.प.शाळांत सुविधांचा वानवा

## १६१ शाळांची वीज खंडित, जरेवाडी पॅटर्न कसा यशस्वी होणार?

**पाटोदा । प्रतिनिधी**

**तालुक्यात जिल्हा परिषद शाळांमध्ये मूलभूत सुविधांचा मोठा अभाव असून, यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होत आहे. गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या अहवालानुसार, तालुक्यातील १८१ शाळांपैकी १६१ शाळेतील वीजपुरवठा थकलेल्या बिलामुळे खंडित झाला आहे. यामुळे 'जरेवाडी पॅटर्न' सारख्या डिजिटल शिक्षण योजना कशा यशस्वी होणार, असा प्रश्न पालक विचारत आहेत.**

तालुक्यात अनेक शाळांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. ६४ ठिकाणी नवीन वर्गखोल्यांची तातडीने गरज आहे, तर ५४ शाळांच्या खोल्यांचीदुरुस्ती आवश्यक आहे. अनेक शाळांमध्ये शौचालय नसल्याने विद्यार्थी आणि शिक्षकांची मोठी गैरसोय होत आहे. विशेषतः मुलींना यामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.तसेच, शालेय पोषण आहार शिजवण्यासाठी स्वयंपाकगृह नसल्याने तो उघड्यावर किंवा वरांड्यात शिजवावा लागतो, ज्यामुळे स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

### डिजिटल शिक्षणाचा बोजवारा

शिक्षण विभागाकडून तालुक्यात १७० शाळांमध्ये ई-लर्निंगची सुविधा असल्याचा आणि ११० शाळांमध्ये एलईडी टीव्ही उपलब्ध असल्याचे सांगितले जात असले तरी, वस्तुस्थिती वेगळी आहे. तालुक्यातील १८१ शाळांपैकी केवळ २८ शाळांमध्ये संगणक उपलब्ध आहेत, तर १५३ शाळांमधील विद्यार्थ्यांनी अद्याप संगणक पाहिलेला नाही. ज्या ठिकाणी ई-लर्निंग साहित्य पोहोचले आहे, त्या शाळांमध्ये वीजच नसल्यामुळे त्याचा वापर करणे शक्य होत नाही.

**विद्यार्थ्यांनाही चिंता**

जिल्ह्यात शिक्षण विभागाने मोठ्या गाजावाजाने 'मिशन जरेवाडी पॅटर्न' लागू केला आहे; परंतु याच तालुक्यातील १६० हून अधिक शाळा आजही डिजिटल शिक्षणापासून वंचित आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण कधी मिळणार, असा संतप्त सवाल पालकवर्गातून व्यक्त केला जात आहे. प्रशासनाने या गंभीर परिस्थितीकडे तातडीने लक्ष देऊन मूलभूत सुविधा उपलब्ध कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

# अनिल राधे मित्र परिवाराच्या वतीने आमदार अमित गोरखे यांचा सत्कार

माजलगाव । प्रतिनिधी

मातंग समाजाचे लोकप्रिय आमदार अमितजी गोरखे हे आमदार झाल्यानंतर प्रथमच माजलगाव विधानसभा मतदारसंघात आले असता त्यांचा अनिल राधे मित्र परिवाराच्या वतीने तेलगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे जंगी स्वागत व सत्कार करण्यात आला.

मातंग समाज भूषण आमदार अमितजी गोरखे हे दि. ३० ऑगस्ट शनिवार रोजी माजलगाव मतदार संघात तेलगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आले असता अनिल राधे मित्र परिवाराच्या वतीने त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले तर क्रेनच्या सहाय्याने भव्य मोठ्या



पुष्प हाराने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ब्रह्म गावचे युवा उपसरपंच अनिल राधे कांबळे, शहादेव पाटोळे, बंडू लोखंडे, मल्हारी ढगे, अशोक थोरात, नारायण कांबळे, अनिल ढगे, अशोक पाटोळे, चंद्रकांत पाटोळे, हनुमंत अडागळे, सुरेश पाटोळे, अमोल पाटोळे, मिलिंद पाटोळे, किशोर पाटोळे, सचिन पाटोळे, ज्ञानेश्वर पाटोळे, संग्राम पाटोळे, अर्जुन पाटोळे, करण पाटोळे, वचीष्ट पाटोळे, अभिषेक आडागळे, सुनील अडागळे, कैलास अडागळे, संतोष लोखंडे, अभिषेक पाटोळे, लखन पाटोळे ईश्वर येवले, अविनाश कांबळे, नितीन कांबळे, विकास शेरकर, विलास लोखंडे, विक्रांत कांबळे, संकेत कांबळे, श्याम कांबळे, शरद कांबळे, युवराज कांबळे, प्रवीण कांबळे, तात्यासाहेब कांबळे, सागर कांबळे, सिद्धेश्वर कांबळे यांचे सह ◀◀ पान २ वर



**बीड : मा,ना,पंकजाताई गोपीनाथजी मुंडे साहेब यांच्या नेतृत्वाखाली मा,खा,डॉक्टर प्रीतमताई गोपीनाथजी मुंडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यनाथ बँक परळी ची निवडणूक बिनविरोध झाल्यामुळे त्यांना प्रत्यक्ष यशश्री निवासस्थानी भेटून हार्दिक हार्दिक अभिनंदन देताना द्वारकाधीश मित्र मंडळ बीड**

# राष्ट्रसंत भगवान बाबांनी पशुहत्या बंद केली- फुलचंद कराड

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

वारकरी संप्रदायात राष्ट्रसंत भगवानबाबांची शिकवण मोठी असुन त्यांनी केवळ गोहत्याच नव्हे तर पशुहत्या बंद केली होती.यासाठी त्यांनी आपल्या किर्तनाद्वारे गावोगावी प्रचार केला असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जेष्ठ नेते तथा भगवान सेनेचे सरसेनापती फुलचंदराव कराड यांनी केले.

परळी तालुक्यातील लिंबोटा येथे राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यानिमीत सकाळी ९ वाजता फुलचंदराव कराड यांच्या हस्ते संत भगवानबाबा यांच्या प्रतिमेचे पुजन व ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी बोलताना कराड म्हणाले की भगवानबांच्या



**लिंबोटा येथे भगवानबाबांची जयंती उत्साहात साजरी**

गडाच्या उद्घाटनाला मुख्यमंत्री ना.यशवंतराव चव्हाण आले होते यावरूनच भगवानबाबांची महंती सिध्द होते.ते पाण्यावर बसुन ज्ञानेश्वरी वाचत होते.एकाचवेळी दोन गावांत त्यांचे किर्तन झाल्याच्या अख्यायिका आहेत.बाबांमुळे लोक वारकरी सांप्रदायाकडे मोठ्या प्रमाणावर वळले असुन आमचे लिंबोटा गाव छत्रपती शिवाजी महाराज,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर,राष्ट्रसंत भगवानबाबा अशा संत,महापुरुषांच्या जयंत्या सर्वजण मिळुन साजरा करणारे गाव असुन सर्व जाती- धर्माचे लोक एकदिलाने रहातात.गावाच्या एकजुटीमुळे सर्व काही सुरळीत चालत असल्याचे सांगितले.दुपारी १ ते ३ या वेळेत ह.भ.प.तुकाराम महाराज शास्त्री यांचे किर्तन झाले.यात त्यांनी संत भगवानबाबा यांचे संपुर्ण चरित्र सांगितले.या कार्यक्रमास दिलीप आण्णा कराड,सुदामअप्पा मुंडे,मा.सरपंच सुर्यकांत मुंडे,ग्रा.पं.सदस्य अरुण मुंडे,रवी कराड,सुधाकर बनसोडे,विश्वनाथ मुंडे,जयराम बापु,मनोज मुंडे,इंद्रमोहन मुंडे,महादेव कराड,प्रशांत कराड,बालु कराड,रामा कराड,मंचक मुंडे आदींसह गांवकरी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कुंडलिका प्रकल्पातून १६८३ क्युसेक्स विसर्ग सुरु

वडवणी । प्रतिनिधी

दि. ३१/०८/२०२५ रोजी ठीक दुपारी :४:०० वाजता उर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्प धरणाच्या सांडव्याची २ वक्रद्वार २५ सेंटी मीटर उघडून कुंडलिका नदीपात्रात १६८३ क्यूसेक्स (४७.८३ क्यूमेक्स )इतका विसर्ग करण्यात आलेला आहे. धरणामध्ये येणारी पाण्याची आवक पाहून विसर्ग वाढवणे/कमी करणे बाबत निर्णय घेण्यात येईल. नदी काठावरील/पुरामुळे बाधित होणाऱ्या गावातील नागरीकांनी खबरदारी घ्यावी व कुंडलिका नदी पात्रात जाऊ नये.असा सतर्कतेचा इशारा उपविभागीय अधिकारी कुंडलिका कालवा उपविभाग बीड यांनी दिला आहे.

# आल्या गौराई सोनपावली

## गौरीचे पिंपळवंडी-अंमळनेर परिसरात उत्साहात आवाहन

पिंपळवंडी । प्रतिनिधी

महालक्ष्मी अर्थात ज्येष्ठा गौरी,गौरी अर्थात संपत्तीची देवता,ज्येष्ठा,कनिष्ठा गौरी लक्ष्मीचे प्रतीक आहे.त्या ज्येष्ठा कनिष्ठा गौरी महालक्ष्मीचे रविवार दि.३१/०८/२०२५ रोजी पिंपळवंडी-अंमळनेर परिसरासह



बीड जिल्हाभरात अनेक घरोघरी उत्साहात आवाहन झाले.यावर्षी महिलांनी रविवारी सायंकाळी ५:२५ पर्यंत हा शुभ मुहूर्त साधून गौरींना पुजन करून घरात आणले.व तीन दिवसीय उत्साह सोहळ्यात सुरुवात केली. काही कुटुंबीयांनी गौरींच्या उभारणीसाठी अगोदरच उभारणी करून ठेवली होती.तर काहींनी रात्री मखर उभारणी करून गौरींचे प्रतिष्ठापना केली व विविध धान्यांच्या रासी मांडून आकर्षक सजावट करण्यात आली. आज दि.१ सप्टेंबर सोमवार रोजी गौरीपूजन व भोजन असून तसेच दि.२ मंगळवार रोजी गौरी विसर्जन रात्री ९:५० पर्यंतचा मुहूर्त आहे.पिंपळवंडी येथील पत्रकार बबनराव उकांडे यांच्या निवासस्थानी प्रतिवर्षाप्रमाणे उकांडे परिवारातील सुहासीनींनी व मुलींनी गौरींचे उत्साहात आगमन करून रविवार रोजी प्रतिष्ठापना केली.

# घाटनांदूर येथील ग्रामसभेत दारू, मटका, गुटखा बंदीचा ठराव

घाटनांदुर । प्रतिनिधी

येथील ग्रामपंचायतच्या ग्रामसभेत महिलांनी दारू गांजा मटका गुटखा बंदीचा ठराव मांडून तो महिलांनी एकमताने ठराव पास केला आहे. यामुळे दारू गांजा गुटखा विक्रेतेचे व मटका चालकाचे धाबे दणाणले आहेत.घाटनांदूर ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने (ता.३०) शनिवारी विविध विकास कामाचा ठराव घेण्यासाठी कार्यालयासमोरील सरपंच महेश गारठे यांच्या अध्यक्षतेखाली



ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. या ग्रामसभेच्या वेळी बहुजन विकास मोर्चाच्या वतीने महिलांचा मोर्चा आला यावेळी गावातील दारू मटका गुटखा बिंगो लॉटरी विरोधी घोषणा देत दारू गांजा मटका बिंगो लॉटरी बंद करण्याचे हातात फलक घेऊन ग्रामसभेत सहभाग घेऊन सर्व प्रकारची दारू व गांजा मटका बिंगो लॉटरीमुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाल्याने व घरातील कर्ते पुरुष युवक दारू मटक्याच्या आहारी जाऊन व्यसनाधीन होऊन मृत्य पावल्याने अनेक कुटुंब उध्वस्त झाल्याने महिलांनी दारू मटका बंदीचा ठराव मांडला व बहुमताने पास केला आहे. यावेळी दारू गांजाच्या व मटक्याच्या व्यसनाने उध्वस्त झालेल्या कुटुंबातील महिलांनी आपल्या व्यथा मांडताना आश्रूनावर झाले.

यावेळी सरपंच महेश गारठे यांनी गावातील दारू गांजा मटका बंदीसाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

# युसूफवडगांव शिवारातुन भाकरीची शिदोरी घेऊन टेम्पो मुंबईच्या दिशेने रवाना

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसुफवडगांव व परिसरातील गावातुन सर्व समाज बांधवांनी एकत्रीत येऊन मुंबई येथे आपल्या समाज बांधवांसाठी पोटापाण्याची व्यवस्था म्हणुन भाकरीची शिदोरी पाठवली आहे.



मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून उपोषणास बसलेले मनोजदादा जरांगे पाटील यांना समर्थन देण्यासाठी गाव खेड्यातुन मोठ्या संख्येने समाज बांधव मुंबई मध्ये गेले आहेत पण सरकारने आझाद मैदाना शेजारील सर्व हॉटेल खाऊ गल्ल्या बंद करून ◀◀ पान २ वर

## सततच्या पावसामुळे पाटोदा तालुक्यात खरीप पिकाचे मोठे नुकसान

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात गेल्या पंधरा दिवसापासून सतत पडणाऱ्या पावसामुळे खरीप पिकाचे मोठे नुकसान झाले आहे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक संकटाला तोंड द्यावे लागत आहे यामुळे प्रशासनाने शेतकऱ्यांच्या झालेल्या खरीप पिकाचे नुकसानीचे पंचनामे करून राज्य सरकारने शेतकऱ्यांना मदत द्यावी अशी शेतकरी वर्गाकडून मागणी होत आहे पाटोदा तालुक्यात गेल्या पंधरा दिवसापासून सतत पडणाऱ्या पावसामुळे शेतामध्ये पाणीसा असल्याने खरीप पिकाचे मोठे मुस्कान झालेले दिसत आहे शेतकऱ्यांची शेती उपळली असून शेतकऱ्यांचे सोयाबीन कापूस पिक पूर्णपणे वाया गेले आहे वडील पीक काढण्याच्या अवस्थेत असताना पावसाने उघडणे दिल्याने उडीद मूग पिकाची मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले दिसत आहे. शेतकऱ्यांनी मागामावल्याचे बी घेऊन खते बी पेरली आहेत मात्र ◀◀ पान २ वर



**गेवराई : आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षक तथा मादळमोही केंद्राचे केंद्रीय मुख्याध्यापक महादेव राजेसाहेब चव्हाण यांच्या सेवापूर्ती समारंभाच्या निमित्ताने त्यांचा शिक्षक प्रदीप सराफ संतोष पडोळे दिलीप भांडवलकर आणी मित्र परिवाराच्या वतीने मादळमोही येथे संपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी गेवराई तालुक्यातील अधिकारी शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**


# 'राधाराणी की जय' च्या गजरात इस्कॉनमध्ये राधाष्टमी महोत्सव साजरा



**बीड । प्रतिनिधी**

**राधा रानी की जय महारानी की जय बरसाने वाले की जय जय गजरात आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ इस्कॉन तर्फे श्री राधा गोविंद मंदिर मध्ये राधाष्टमी महोत्सव मोठ्या उत्साहामध्ये संपन्न झाला.**

पहाटे साडेचार वाजल्यापासून मंदिरामध्ये मंगल आरती शृंगार दर्शन ,सकाळी साडेनऊ वाजल्यापासून राधाराणी यांच्या प्राकट्य दिनाच्या निमित्ताने वैष्णव गीते ,श्री श्री राधाकृष्ण यांचा दूध दही मध व पंचगव्याने महाअभिषेक, श्री राधाराणी यांची विशेष कथा व त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. श्री राधा राणी यांच्या कथेमध्ये विशेषत्वाने सांगताना श्रीमान संत दास प्रभू यांनी असे



सांगितले की, श्री राधाराणी ही भगवान श्रीकृष्णापासून अभिन्न आहे . पूर्ण पुरुषोत्तम भगवान श्रीकृष्ण यांना आनंद प्रदान करण्यासाठी स्वतः श्रीकृष्ण ज्या विस्तार रूपामध्ये आपला विस्तार करतात ती म्हणजे राधा राणी. राधाराणी पासूनच सर्व महालक्ष्मी, दुर्गा, भगवान श्रीकृष्णांच्या पट्टराण्या रुक्मिणी सत्यभामा आदी विस्तारित म्हणून श्री राधा राणी ही भगवंताहून अभिन्न आहे . पद्मपुराणांमध्ये असा उल्लेख आहे की राधाराणीच्या प्रकट्या दिवशी जो व्यक्ती उपवास करतो त्या व्यक्तीला एक लक्ष एकादशी केल्याचे फळ प्राप्त होते असेही त्यांनी सांगितले. श्री श्री राधा गोविंद यांना विशेष पोशाख परिधान करण्यात आला होता व मंदिराला अतिशय सुबक सजावट करण्यात आली होती. दुपारी साडेबारानंतर महाआरती होऊन सुमारे हजारो भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास विशेष सहभाग श्रीमान संत दास प्रभू श्रीमान विठ्ठल आनंद प्रभू श्री श्री राधा गोविंद भक्त समाज सर्व भक्तांचे विशेष सहभाग विशेष सहकार्य लाभले. अशी माहिती इस्कॉन बीड चे प्रतिनिधी श्रीमान कृष्णनाम दास यांनी दिली.

# आंतरराष्ट्रीय भारत गौरव सन्मानने रामायणाचार्य संजय गित्ते महाराज सन्माननीत

बीड । प्रतिनिधी

हभप रामायणाचार्य संजय सिताराम गित्ते महाराज नमस्कार ग्रुप गाझियाबाद यांच्या वतीने दिल्या जाणाऱ्या भारत गौरव सन्मान २०२५ या देशातील सर्वोच्च पुरस्काराने बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदरणीय जितीन रहेमान , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी साहेब, इतर मागास प्रवर्ग विकास विभागाचे संचालक दत्तात्रय क्षिरसागर, जात पडताळणी समितीच्या अध्यक्षा मेश्राम मॅडम, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे यांच्यासह मान्यवर मंडळींच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले. जामखेड तालुक्यातील मौजे डिघोळ येथील हभप रामायणाचार्य संजय सिताराम गित्ते महाराज यांच्या साहित्य, संगीत, योग व



सामाजिक कार्याच्या ४५ वर्षाच्या प्रदिर्घ साधनेची दखल घेऊन आंतरराष्ट्रीय पातळीवरील भारत गौरव सन्मान २०२५ या पुरस्काराने आज रविवार दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी बीड शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे जागतिक भटके विमुक्त दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात हभप संजय महाराज गित्ते यांना बीड ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# शिरूर पोलिसांची धडाकेबाज कारवाई ! तीन गावठी पिस्तुले, दहा जिवंत काडतुसे आणि ॲक्टीव्हा जप्त

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील आमदाबाद फाटा येथे काळ्या रंगाच्या विनानंबर ॲक्टीव्हा गाडीवर थांबलेल्या दोन संशयित युवकांकडून शिरूर पोलिसांच्या डी.बी. पथकाने तीन गावठी पिस्तुले, दहा जिवंत काडतुसे आणि एक ॲक्टीव्हा असा एकूण १ लाख १५ हजारांचा ऐवज जप्त करून आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत.



दिनांक २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७.४५ वाजता पोलीस कॉन्स्टेबल विजय शिंदे यांना गुप्त बातमीदारामार्फत कळाले की, आमदाबाद फाटा परिसरात दोन इसम कमरेला पिस्तुल लावून ॲक्टीव्हा गाडीवर थांबलेले आहेत. ही माहिती तात्काळ पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण यांनी पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांना कळवली. त्यानंतर डी.बी. पथकाने पंचासह आमदाबाद फाट्याजवळ सापळा रचून संशयितांना गाठले.

पोलिसांनी शिताफीने केलेल्या कारवाईत १. समीर उर्फ नवाब वजीर शेख (वय २०, रा. शिरटे, ता. वळवा, जि. सांगली),२. दिपक शिवलींग वांगणे (वय २०, रा. अमरदीप सोसायटी, कारेगाव, ता. शिरूर) या दोघांना ताब्यात घेऊन दोन गावठी पिस्तुले, चार जिवंत काडतुसे आणि विनानंबर ॲक्टीव्हा जप्त करण्यात आली.

गुन्हा नोंदीनंतर पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण तपास करत असताना आरोपी दिपक वांगणे याच्याकडून आणखी एक गावठी पिस्तुल आणि सहा जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. यामुळे ३ गावठी पिस्तुले,१० जिवंत काडतुसे, ॲक्टीव्हा मोटारसायकलअसा एकुण किंमत सुमारे १,१५,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या गुन्ह्याबाबत पोलीस कॉन्स्टेबल सचिन भोई यांनी शिरूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, आरोपींवर भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ तसेच भारतीय न्याय संहिता कलम ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना न्यायालयात हजर केले असता त्यांना १ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी रिमांड देण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक शसंदीप गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले व मा. पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण, पो.ह. अक्षय कळमकर, पो.अंमलदार विजय शिंदे, नितेश थोरात, निरज पिसाळ, सचिन भोई, निखील रावडे, रविंद्र काळे, अजय पाटील, रविंद्र आव्हाड आदींचा सहभाग होता

# इंदापूरात दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिर

इंदापूर । प्रतिनिधी

आयुष्य जगण्यासाठी आधार हवा आणि हा आधार देणारे हात बनणे हे खरे जीवन आहे. भारतीय संस्कृतीत दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना आदराचे स्थान आहे. त्यांच्या हिताची काळजी घेणे हे आपले सामाजिक कर्तव्य आहे, असे आवाहन राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले.



भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (एलिम्को) आणि कै. भगवानराव भरणे प्रतिष्ठान, इंदापूर यांच्या संयुक्त विद्यमाने इंदापूर तालुक्यात दिव्यांग आणि राष्ट्रीय वयोश्री योजनेअंतर्गत लाभार्थ्यांसाठी दोन दिवसीय मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी बोलताना मंत्री भरणे यांनी सांगितले, आरोग्य हा प्रत्येकाचा मूलभूत अधिकार आहे. वयोमानामुळे किंवा अपंगत्वामुळे कोणीही समाजापासून वंचित राहू नये, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. या शिबिरातून हजारो लाभार्थ्यांना नवी ऊर्जा मिळेल आणि त्यांचे दैनंदिन जीवन सुलभ होईल.

शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने लाभार्थ्यांची शारीरिक तपासणी करून त्यांना आवश्यक असलेल्या सहाय्यक साधनांची (काठी, व्हीलचेअर, श्रवणयंत्र, चष्मे आदी) नोंद केली. पात्र लाभार्थ्यांना राष्ट्रीय वयोश्री योजनेअंतर्गत व्हीलचेअर, कमोडसह व्हीलचेअर, काठ्या, श्रवणयंत्र, कंबर, गुडघा, पाठ आणि गळ्याचे पट्टे, बसण्याची गादी, कमोड चेअर आदी साधने शासनामार्फत मोफत उपलब्ध करून देण्यात आली. या शिबिराला हजारो ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग बांधवांनी उपस्थिती दर्शवली.

कार्यक्रमाला जिल्हा परिषद सदस्य प्रताप पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे हनुमंत कोकाटे, अतुलराव झगडे, सचिन सपकळ, विष्णू पाटील यांच्यासह इंदापूर शहरातील प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि लाभार्थी उपस्थित होते. या शिबिराने सामाजिक बांधिलकी आणि कर्तव्याचा आदर्श प्रस्थापित केला.

# तिच्या रक्षणासाठी पोलिसांचा थेट गोव्यापर्यंत पाठलाग

पुणे । प्रतिनिधी

**किरकोळ कारणावरून झालेल्या मारहाणीची पोलिसांत तक्रार केल्याने सोशल मिडीयावर बदनामी करणाऱ्यास सहकारनगर पोलिसांनी थेट गोव्यापर्यंत पाठलाग करून अखेर कानून के हाथ लंबे होते है, याचा प्रत्यय आणून दिला.घरातील दारूची बाटली लपवली म्हणून एका महिलेला परिचिताने बेदम मारहाण केली. हा परिचीत कर्नाटकचा रहिवासी असून त्याचे नाव विक्रम चंद्रकांत बुटीया (३८) असे आहे.**



फिर्यादी महिलेस लाथाबुक्क्यांनी निर्दयपणे मारहाण केल्यावर विक्रमने शेवटी बांबूचे फटके मारुन गंभीर जखमी केले. तिने याची तक्रार सहकारनगर पोलीस ठाण्यात दिल्यावर विक्रम शांत बसला नाही. सूडाग्नी अजून पेटलेलाच होता. पुण्यातून फरार झाल्यावर विक्रम कुठेतरी लपून बसला होता. तो रोज नवी-नवी पोस्ट करून महिलेची अब्रू चव्हाट्यावर आणत होता.

सोशल मीडियावर अचानक फिर्यादी महिलेचे आपत्तिजनक फोटो, व्हिडिओ येऊ लागले. प्रत्येक नवा फोटो, व्हिडिओमुळे तिला जगणे नकोसे झाले. मनोधैर्य तुटतलेल्या फिर्यादीने जगण्यापेक्षा मरणे सोपं म्हणत आत्महत्येचा विचार केला. मात्र भरोसा सेलच्या अधिकाऱ्यांनी वेळेवर हस्तक्षेप केला. समुपदेशन करून तिचे प्राण वाचवले.

एवढेच नव्हे तर बदनामी करणाऱ्या आरोपीचा गोव्यापर्यंत पाठलाग करत त्याला जेरबंद केले

आरोपी कुठेही लपला तरी आम्ही पकडणारच, असा निर्धार केलेल्या पोलिसांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली एक विशेष पथक तयार केले. कर्नाटकपासून गोव्यापर्यंत पोलिसांनी माग काढला. फोन लोकेशन, ट्रकचा मागोवा, हॉटेलांच्या चौकशा असा प्रत्येक धागा जोडत पोलीस पथक विक्रमच्या जवळ पोहचू लागले. दरम्यान पोलिसांना माहिती मिळाली की विक्रम ट्रक घेऊन गोव्याच्या दिशेने गेला आहे. पथकाने गोव्याच्या दिशेने धाव घेतली महामार्गावरील पोलिसांचे डोळे विक्रमच्या ट्रकच्या मागावर होते. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बांदा तालुक्यातील एका हॉटेलपाशी ट्रक उभा असल्याचे कळल्यावर क्षणार्धात पोलिसांनी वेढा घातला. दार ठोठावले आणि समोर आलेल्या विक्रम बुटीयाच्या पोलिसांनी क्षणात मुसक्या आवळल्या.

# प्रभाग रचनेची तक्रार न करता स्वबळावर निवडणुकीसाठी सज्ज व्हा - अजित पवार

पुणे । प्रतिनिधी

प्रभाग रचनेत काय झाले? काय नाही, यावर आता रडत बसू नका, जसे आहे तसे मान्य करून, युतीची वाट न पाहता स्वबळावर लढण्यासाठी निवडणुकीच्या तयारीला लागा, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पक्षाच्या माजी नगरसेवकांना सुनावले. पालिकेत काँग्रेसची सत्ता होती तेव्हा प्रभाग रचना सुरेश कलमाडीच ठरवायचे. असे असतानाही आपण निवडून येत होतो, हे विसरू नका आणि तयारीला लागा, असे सांगत त्यांनी नगरसेवकांना धीरही दिला.



महापालिकेची प्रारूप प्रभाग रचना जाहीर झाल्यानंतर अजित पवार यांनी पहिल्यांदाच पुण्यात राष्ट्रवादीच्या माजी नगरसेवकांची बैठक घेतली. बैठकीस शहराचे प्रमुख पदाधिकारी तसेच सर्व माजी नगरसेवक उपस्थित होते. बैठकीच्या सुरूवातीस माजी नगरसेवकांनी प्रभाग रचनेत राष्ट्रवादीच्या नगरसेवकांच्या प्रभागात मोठी मोडतोड झाली असून ही प्रभाग रचना केवळ भाजपला अनुकूल असल्याच्या तक्रारी मांडल्या. तसेच भाजपने विश्वासात घेतले नसल्याची तक्रारही करण्यात आली. याशिवाय, पुण्यात महायुती होणार की नाही, हे स्पष्ट करण्याची मागणीही करण्यात आली. त्यानंतर पवारांनी प्रभाग रचनेवरून नगरसेवकांचीच कानउघडणी केली.

काहींनी मदत केली नाही..

प्रभाग रचनेबाबत मी स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोललो होतो. त्यांनी काळजी करण्याचे कारण नाही, असे सांगितले होते. स्थानिक पातळीवर याबाबत सूचनाही दिल्या होत्या. मात्र, स्थानिक पातळीवर काही लोकांनी आपल्याला मदत केली नाही. आपण मात्र त्यांना लोकसभा, विधानसभेसाठी मदत केली. प्रत्यक्षात खाली वेगळाच प्रकार घडला. त्यामुळे आता आपणही तीन महिन्यांत आपल्या पद्धतीने पुढे जाऊ, असे पवार यांनी स्पष्ट केले. यावेळी शहरातील स्थानिक नेत्यांची नावे घेत त्यांनी राग व्यक्त केला.

तीन महिने महत्त्वाचे..

आता प्रभाग रचनेबाबत आपण काहीच करू शकत नाही. त्यामुळे प्रभाग रचनेवर हरकती घ्या, पण त्याचवेळी युती होण्याची वाट न पाहता स्वबळाची तयारी करा. निवडणुकांसाठी शेवटचे तीन महिने महत्त्वाचे असतात. या कालावधीत लोकांपर्यंत पोहोचल्यास तुम्हाला निवडून येण्यापासून कोणीही अडवू शकणार नाही. पालिकेत सत्तेत असताना काँग्रेसच्या विरोधात आपण खड्डे, बीआरटीसारखे प्रश्न उपस्थित करत निवडून आलो. आपण पिंपरी-चिंचवडही मिळवले. त्यामुळे आता पुण्यातही हेच करा, असा सल्ला देत पवारांनी अप्रत्यक्षपणे स्थानिक पातळीवर भाजपच्या विरोधात प्रश्न मांडण्याचा सल्लाच माजी नगरसेवकांना दिला.

# पुणे-जम्मू तावी झेलम एक्सप्रेस दोन दिवस रद्द



पुणे - जम्मू-काश्मीरमध्ये जोरदार पाऊस सुरू असल्याने पुण्यावरून धावणारी पुणे-जम्मू तावी झेलम एक्स्प्रेस सलग दोन दिवस रद्द करण्यात आली. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय झाली असून, गाडी रद्द झाल्यामुळे काहींना प्रवास रद्द करावा लागला. या ट्रेनने महाराष्ट्रासह अन्य ठिकाणी जाणाऱ्या मार्गावर प्रवाशांना खासगी बस, एसटीने प्रवास करावा लागला.

पुणे-जम्मू तावी झेलम ही पुणे विभागातील महत्त्वाची रेल्वे गाडी आहे. पुण्यातून थेट जम्मूमध्ये जाण्याची सोय असल्याने या गाडीला बारा महिने गर्दी असते. शिवाय उत्तर प्रदेश, दिल्ली या शहरांना ही रेल्वे थेट जोडत असल्याने पुण्यातून जाणाऱ्या प्रवाशांची संख्या जास्त आहे. परंतु, गेले दोन दिवस होत असलेल्या पावसामुळे ही रेल्वे रद्द करण्यात आली आहे.

यामुळे प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. ही गाडी रद्द झाल्यामुळे आपल्या गावी परतणाऱ्या उत्तरेतील प्रवाश्यांची कोंडी झाली आहे. अनेकांना प्रवास रद्द करावा लागला. तसेच मराठवाडा आणि विदर्भातही जोरदार पावसामुळे काही रेल्वे गाड्यांना फटका बसला आहे. काही गाड्यांचे मार्ग बदलण्यात आले आहे.



## पोलिसांचे मोठे यश ; गणेशोत्सवात विक्रीसाठी आलेला २८ किलो गांजा जप्त


पुणे - गणेशोत्सवात विक्रीसाठी पाठविलेला २८ किलो गांजा वाघोली पोलिसांनी जप्त केला. याप्रकरणी धुळ्यातील एका तरुणाला अटक केली आहे. त्याच्याकडून गांजा, मोटार असा दहा लाख ८६ हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. विलेश धारासिंग पावरा (२२, रा. ता. शिरपूर, जि. धुळे) याल अटक केली आहे. त्याच्यावर अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये (एनडीपीएस) वाघोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

गणेशोत्सवात गांजा विक्रीस येणार असल्याची माहिती गस्तपथकाला मिळाली. वाघोलीत एका हॉटेलजवळ पोलिसांनी सापळा लावला. हॉटेलजवळ मोटार थांबली असता पावरा याच्या संशयास्पद हालचाली दिसल्या. चौकशीसाठी ताब्यात घेतले असता पिशवीत दहा किलो गांजा सापडला. परिमंडळ चारचे पोलीस उपायुक्त सोमय मुंढे, सहायक आयुक्त प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली वाघोलीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज हांडे, गुन्हे शाखेचे निरीक्षक आसाराम शेटे, उपनिरीक्षक मनोज बागल, कर्मचारी रमेश साबळे, बाबासाहेब मोराळे, राम ठोंबरे आदींनी ही कामगिरी केली.

# अजित पवारांच्या मार्गदर्शनाखाली 'माळेगाव'चा शाश्वत विकास - नितीन सातव

बारामती । प्रतिनिधी

बारामती तालुक्यातील माळेगाव सहकारी साखर कारखाना हा राज्यात उच्चांकी ऊसदर देणारा कारखाना म्हणून ओळखला जातो. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कारखान्याच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर तातडीने काही निर्णय घेतले. त्यामुळे दादांच्या मार्गदर्शनाखाली 'माळेगाव'ची शाश्वत विकासाकडे वाटचाल सुरू असल्याचे संचालक नितीन सातव यांनी सांगितले.



सातव म्हणाले की, माळेगाव कारखान्याची गाळपक्षमता वाढवली आहे. मात्र, कारखान्याचे कार्यक्षेत्र तुलनेने कमी आहे. त्यामुळे कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस जेमतेम ७ ते ८ लाख मेट्रिक टन उपलब्ध होतो, तर जवळपास ५ ते ७ लाख मेट्रिक टन उसासाठी कारखाना प्रशासनाला गेटकेनच्या उसावर अवलंबून राहावे लागते.

दुसरीकडे, आजूबाजूच्या सर्वच कारखान्यांनी स्वतःची गाळपक्षमता वाढविल्यामुळे जास्तीचा ऊस मिळण्यासाठी जिकिरीचे प्रयत्न करावे लागतात. काहीवेळा गेटकेनचा ऊस जास्तीच्या अंतरावरून आणावा लागतो. त्यामुळे ऊस वाहतुकीचा खर्च वाढून ऊसदरावर परिणाम होतो. दरम्यान, ऊसतोडणी व वाहतुकीचे दर देखील वाढले आहेत.त्याचा विचार करता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तातडीने निर्णय घेत शास्वत ऊस उत्पादनवाढ समिती नेमून त्याअंतर्गत कारखान्याच्या कार्यक्षेत्रातच अधिकची ऊस लागवड तसेच एकरी जास्तीचे उत्पादन, यावर भर देण्याचे ठरले. त्या अनुषंगाने उसाच्या वेगवेगळ्या जातीचे बेणे, जमिनीचा पोत, खतांची मात्रा, ठिबक सिंचन याचा अभ्यास करून एआय तंत्राच्या माध्यमातून कारखान्याच्या कार्यक्षेत्रातच जास्तीचे उसाचे पीक निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यामुळे भविष्यात कारखान्याचा हा उपक्रम गेमचेंजर ठरणार असल्याचे मत सातव यांनी व्यक्त केले.

# खडकवासला साखळीतून मुठा नदीतील विसर्ग बंद

वेल्हे: खडकवासला धरणसाखळीतून मुठा नदीच्या पात्रात सोडण्यात येत असलेला विसर्ग शनिवारपासून पूर्णपणे बंद करण्यात आला. पानशेत-वरसगाव खोर्यासह सिंहगड खडकवासला भागात शनिवारी (दि.३०) सकाळपासून ऊन पावसाचा लपंडाव सुरू आहे.



सायंकाळी पाच वाजता खडकवासला धरणसाखळीत २८.४९ टीएमसी म्हणजे ९७.७३ टक्के साठा झाला होता. (डरींर्शीं र्झीपश छ्शुी)

शनिवारी दिवसभराच्या उघडिपीनंतर सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास पानशेत सिंहगड भागात तासभर दमदार पावसाने हजेरी लावली. त्यानंतर पुन्हा उघडीप दिली. धरणक्षेत्रात पावसाळी वातावरण कायम आहे. मात्र, तुरळक पावसानंतर ऊन पडत आहे. शनिवारी दिवसभरात चारही धरणमाथ्यावर पावसाची नोंद झाली नाही.

खडकवासला धरणशाखेच्या शाखा अभियंता गिरीजा कल्याणकर -फुटाणे म्हणाल्या, धरणक्षेत्रात जोरदार पाऊस नसल्याने पाण्याची आवक कमी झाली आहे. त्यामुळे मुठा नदीत पाणी सोडणे बंद केले आहे. शेतीसाठी मुठा कालव्यात १ हजार ५ क्युसेक्सने तसेच शहर व परिसराला पिण्यासाठी ४०० क्युसेक्सने पाणी खडकवासलातून सोडले जात आहे. वरील तिन्ही धरणातून पाणी सोडले जात असल्याने पाण्याची तुट भरून निघत आहे.

# शिवगंगा, गुंजवणी खोऱ्यात बिबट्यांची दहशत

नसरापूर: शिवगंगा, गुंजवणी खोर्यातील अनेक गावांत गेल्या महिन्याभरात बिबट्याने हल्ले केले आहेत. तसेच या परिसरात आताही बिबट्यांचे भरदिवसा दर्शन होते. त्यामुळे या खोर्यांत बिबट्यांची मोठी दहशत पसरल्याचे दिसून येत आहे.

माळेगाव, केळवडे, वर्वे, शिवरे आणि परिसरातील गावामध्ये दिवसाढवळ्या लोकवस्तीत बिबट्या दिसून येत आहे. याबाबत नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही वन विभाग त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे आरोप होत आहेत. बिबट्यांचा बंदोबस्त करण्यात वन विभागाला अपयश आल्याची टीकाही नागरिक करत आहेत. वर्वे (ता. भोर) येथे शनिवारी (दि. ३०) विशाल तांबट, संदीप चिकणे यांच्या घराजवळ व भट्टी नावाच्या शेतात बिबट्यांच्या जोडीचे दर्शन झाले. तसेच दोन दिवसांपूर्वी प्रवीण सोंडकर यांच्या वीटभट्टी परिसरात बिबट्या दिसला. तर माळेगाव - केळवडे रस्त्याच्या कडेला दोन ठिकाणी बिबट्या आढळून आले होते.



एकंदरीतच या परिसरात विविध ठिकाणी बिबट्यांचा वावर असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्याबाबत वन विभाग काहीच निर्णय घेताना दिसत नाही. दरम्यान, लोकवस्तीत बिबट्या येत असल्याने नागरिकांनी पिंजरा लावण्यासाठी वन विभागाला निवेदन दिले होते. दिवसाढवळ्या बिबट्या दिसत असल्याने त्याला पकडावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. मात्र, अद्याप वन विभागाने कोठेही पिंजरा लावला नाही, त्यामुळे नागरिकांत बिबट्यांमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, तीन वर्षांपूर्वी वरवे येथील एका सीसीटीव्हीमध्ये बिबट्या कैद झाला होता. तसेच शेतकरी संजय खोंडगे यांच्या घराबाहेर वासरू बिबट्याने ठार केले होते. करंदी, कांबरे, भोंगवली, पांडे, सावरदरे या परिसरात बिबट्या सतत सावजाच्या शोधात असल्याचेही दिसून आले आहे.

बिबट्याने गोठ्यातील जनावरे, शेळ्या, बकरी यांच्यावर हल्ले केले आहेत. त्यामुळे जनावरांना चारण्यासही पशुपालक धाजवत आहेत. तसेच शेतातील कामे करता येत नसल्याने पिकांचे नुकसान होत असल्याची व्यथा शेतकरी मांडत आहेत. याबाबत नसरापूर वनपरिक्षेत्रेचे अधिकारी वसंत चव्हाण यांच्याशी संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

तक्रारदारावरच वन विभागाचा लकडा

अनेकवेळा लोकवस्तीलगत शेजारच्या शेतकर्यांना अथवा नागरिकांना बिबट्या दिसून आल्यानंतर वन विभागाला कळविले जाते. तोपर्यंत बिबट्या निघून जातो. त्यानंतर वन विभागाचे काही कर्मचारी तक्रारदाराचीच उलटतपासणी करत असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

# विनापरवाना ऊस गाळप केल्यास कारवाई; साखर आयुक्त सिद्धाराम सालीमठ यांचा इशारा

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील आगामी २०२५-२६ मधील हंगामात ऊस गाळप परवान्यासाठी साखर कारखान्यांनी ऑनलाइन अर्ज १ सप्टेंबरपासून करावेत. अर्ज करण्याची अंतिम तारीख ३० सप्टेंबर असून, तत्पूर्वी ते सादर करणे आवश्यक आहे.

साखर कारखान्यांना परवाना अधिकार्यांनी गाळप परवाना दिल्याशिवाय ऊस गाळप करता येणार नाही. विनापरवाना ऊस गाळप सुरू केल्यास कारवाई करण्याचा इशारा साखर आयुक्त सिद्धाराम सालीमठ यांनी नुकत्याच काढलेल्या परिपत्रकान्वये दिला आहे.गाळप परवान्यासाठीचा कालबद्ध कार्यक्रमही कारखान्यांना देण्यात आलेला आहे. गाळप परवाना फी व सुरक्षा अनामत रक्कम भरणा करावयाची आहे. मुख्यमंत्री साहाय्यता निधी हा गतवर्ष २०२४-२५ मधील ऊस गाळपावर प्रतिटन पाच रुपयांप्रमाणे भरावयाचा आहे. तर साखर संकुल निधी हा गतवर्ष हंगाम २०२४-२५ मधील ऊस गाळपावर प्रतिटन पन्नास पैशांप्रमाणे भरावयाचा आहे. सहकारी साखर कारखान्यांनी शासकीय भागभांडवल, कर्ज व हमी शुल्कवसुलीसाठी प्रचलित पद्धतीप्रमाणे साखरेवर टॅगिंगद्वारे शासकीस वसुली प्रतिक्किंटल ५० रुपये व प्रतिक्किंटल २५ रुपयांप्रमाणे साखर विक्रीच्या रकमेतून वसूल करून शासकीय कोषागारात जमा करावी.

राज्यात यंदा हंगाम २०२५-२६ करिता सर्व सहकारी व खासगी साखर कारखान्यांनी गाळप परवाना प्राप्त करून घेतल्याशिवाय गाळप हंगाम सुरू करू नये. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली होणार्या मंत्री समितीमधील निर्णय चालू वर्षीच्या गाळप हंगामाकरिता लागू राहतील. ऑनलाइन गाळप परवाना अर्ज मुदतीत सादर न करणे, गाळप परवाना प्राप्त करून न घेताच गाळप सुरू करणे तसेच गाळप परवान्यातील अटींचे पालन न केल्यास कारवाई करण्यात येईल. अतिरिक्त ऊस उपलब्धता असल्यास साखर कारखाना साखर आयुक्तांच्या पूर्वपरवानगीशिवाय बंद करू नये.